RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

उपलब्ध आहे!
मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर,

प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
संपर्क मो. 8482839451

गुरूवार, १२ जून २०२५ | वर्ष : ५ | अंक : १६५ | दैनिक | किंमत : ₹५/-
Thursday, 12 June 2025 | Year : 5 | Issue : 165 | Daily | Rate: Rs. 5/-

# मराठा समाजाच्या एसईबीसी आरक्षणावर सुनावणी 18 -19 जुलैला ...



**मुंबई :** राज्य सरकाराने मराठा समाजाला एसईबीसी कायद्याअंतर्गत 10 टक्के आरक्षण दिले होते. हे आरक्षण सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणात देण्यात आले होते. मात्र या आरक्षणाच्या विरोधात हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करण्यात आल्या. आरक्षणाच्या बाजुने देखील याचिका दाखल आहेत. आज मुंबई हायकोर्टात मराठा आरक्षणावरील सुनावणी झाली. आज वकिलांनी काय युक्तिवाद केला ते जाणून घेऊयात. सुप्रीम कोर्टाने मुंबई हायकोर्टाला मे महिन्यात मराठा आरक्षणावरील सर्व याचिकांवर सुनावणी घेण्याचे निर्देश दिले होते.आरक्षणाच्या विरोधातील याचिकांमुळे उच्च शिक्षणातील मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना आरक्षण देण्यात अडचण येत असल्याचे समोर आले होते. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या वैधतेबाबतची नव्याने सुनावणी आजपासून मुंबई हायकोर्टात होत आहे. मराठा आरक्षण वैध ठरणार की नाही याची फैसला होणार आहे.




हायकोर्टाचे न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांच्या नेतृत्वाखालील विशेष त्रिसदस्यीय पूर्णपीठ सुनावणी घेत आहे. सुरुवातीला प्रकरण अ ं त रि म दिलास्यासाठी घ्यायचं की फायनल ऑर्डरसाठी यावर वकिल आणि न्यायमूर्ती यांच्यात युक्तीवाद सुरू झाला. यावेळी विरोधी वकिलांनी 'जो पर्यंत तारीख होत नाही तो पर्यंत स्टे द्यावा असा युक्तिवाद केला. यानंतर'फायनल सुनावणीसाठी प्रकरण घेण्यात यावे' असा युक्तिवाद सरकारी वकिलांनी केला.

*मराठा आरक्षणाच्या सुनावणीबाबत बोलताना महाराष्ट्राचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ म्हणाले की, 'सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षणाला आधीच अंतरिम दिलासा आहे.मग पून्हा सुनाणी घेण्यात अर्थ नाही, आता अंतिम सुनावणीला सुरूवात करायला हवी.'*

यानंतर न्यायमूर्तींनी म्हटले की, 'मराठा आरक्षणाच्या विरोधात अनेक याचिका आहेत. त्यामुळे आपण सर्वांनी एकत्र बसून विरोधकांची बाजून नेमकं कोणं मांडणार हे ठरवा.' यावर विरोधी वकिल प्रदीप संचेती यांनी म्हटले की, 'प्रत्येक याचिकाकर्त्याने विविध विषय वाटून घेतले आहे. प्रत्येकाला आपलं मत मांडायचे आहे. त्यामुळे प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार द्यायला हवा.

यानंतर न्यायमूर्ती म्हणाले की, ÷पुढील सुनावणी 18 व 19 जुलैला सायंकाळी 5 वाजता घेऊया का? यावर संचेती म्हणाले, 'आम्हाला अडीच ते तीन दिवस युक्तिवाद करण्यासाठी द्या'. यानंतर सरकारी वकिलांनी, 'आम्हाला युक्तिवादासाठी दोन दिवस हवे आहेत.' अशी मागणी केली.

यानंतर न्यायाधिश घुगे यांनी, ÷मराठी आरक्षणाची पुढील सुनावणी 18 तारखेला 3 वाजता आणि 19 जूलै 2025 रोजी पुर्ण दिवस चालेल अशी माहिती दिली. त्यानंतर 19 जुलै ला पुढची तारीख जाहीर केली जाणार आहे. आज मराठा समजाच्या एसईबीसी आरक्षणवर कुठलाही स्टे दिलेला नाही, त्यामुळे मराठा विद्यार्थ्याना एसईबीसी एडमिशन चा मार्ग मोकळा झाला आहे. आता पुढ़ील सुनावणी पुढ़लि महिन्यत 18 -19 जुलै ला होणार आहे.

# काँग्रेसने कर्नाटकमध्ये पुन्हा जातीनिहाय जनगणनेचा निर्णय ?

**कर्नाटक :** काँग्रेसच्या नेतृत्वाखालील कर्नाटक सरकारने राज्यात पुन्हा एकदा जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांनी यासंदर्भातील माहिती दिली आहे. या दोन्ही नेत्यांनी मंगळवारी राजधानी दिल्लीत जाऊन काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची भेट घेतली होती. यावेळी झालेल्या बैठकीला काँग्रेसचे संघटन महासचिव के.सी. वेणुगोपाल आणि कर्नाटक प्रभारी रणदीप सुरजेवाला हेही उपस्थित होते.




काँग्रेसचे ज्येष्ठ खासदार राहुल गांधी यांनी गेल्या काही वर्षांपासून जातीनिहाय जनगणनेचा मुद्दा जोरकसपणे लावून धरला आहे. हा अहवाल 2015 च्या जातीय सर्वेक्षणाच्या आधारे तयार करण्यात आला, असे काहींचे म्हणणे होते. सर्वेक्षणातील आकडेवारीवरही काँग्रेसच्या काही नेत्यांनी तीव्र आक्षेप घेतला होता. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी या अहवालाला स्वीकारण्याची तयारी दर्शवली होती; तर उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांच्यासह पक्षातील काही नेत्यांनी या अहवालावर प्रश्न उपस्थित केले होते. सर्वेक्षणाशी संबंधित मतभेद आणि वाढते राजकीय तणाव पाहता पक्षाच्या उच्च नेतृत्वाने मंगळवारी कर्नाटकमध्ये पुन्हा जातीनिहाय जनगणनेचे निर्देश दिले आहेत. येत्या तीन महिन्यांत नव्याने आणि अधिक अचूक पद्धतीने राज्यात जातीनिहाय जनगणना करावी, असं काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाने म्हटलं आहे. कर्नाटकमधील काँग्रेसच्या नेत्यांनी हायकमांडच्या या निर्णयाचे समर्थन केले आहे.

कर्नाटकमधील मागासवर्ग आयोगाने सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक सर्वेक्षण 2015 चा अहवाल तयार केला होता. 17 एप्रिल रोजी सिद्धरामय्या मंत्रिमंडळासमोर सादर केला जाणार होता. मात्र, त्याआधी तो लीक झाला होता. जातीय जनगणनेच्या अहवालावरून कर्नाटकमध्ये वाद निर्माण झाला होता. त्यामुळे तो सादर करता आला नाही. वोक्कालिगा आणि लिंगायत समुदायांनी आपली संख्या कमी दाखवली असल्याचा आरोप केला. या दोन्ही समुदायांच्या म्हणण्यानुसार, राज्यात वोक्कालिगा समुदायाची संख्या अंदाजे 10 टक्के, तर लिंगायत समुदायाची संख्या 11टक्क इतकी आहे.

# भाजपाप्रणीत एनडीएमधील युतीतल्या पक्षाकडून दबावाचे राजकारण

**नवी दिल्ली :** यावर्षी होऊ घातलेल्या बिहार निवडणुकीसाठी भाजपाने जोरदार तयारी सुरू केली आहे. एनडीएमधील घटक पक्षांना बरोबर घेऊन भाजपा पुढे जात असताना आता जागावाटपासंदर्भात काही आव्हाने निर्माण होण्याची शक्यता आहे. बिहारमधील घटकपक्ष आपापली ताकद दाखवून अधिकाधिक जागा पदरात पाडून घेण्यासाठी प्रयत्नशील आहेत. बिहारमध्ये सध्या जनता दल संयुक्त पक्षाच्या नेतृत्वाखालचे सरकार आहे. भाजपा आणि जेडीयूबरोबर एनडीएत केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांचा लोजप (रा), केंद्रीय मंत्री जीतनराम मांझी यांचा 'हम' आणि राज्यसभा खासदार उपेंद्र कुशवाहा आहेत. भाजपा आणि जेडीयू हे प्रमुख पक्ष असल्यामुळे त्यांच्या पारडयात अधिक जागा पडतील, असे मानले जाते. मात्र इतर पक्ष अधिकाधिक जागा मिळविण्यासाठी आता आक्रमक प्रतिक्रिया देऊ लागले आहेत. या प्रतिक्रियामधून भाजपा-जेडीयूवर दबाव वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे.



लोक जनशक्ती पक्षाचे (रामविलास) प्रमुख आणि केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांनी काही दिवसांपूर्वी आरा येथे झालेल्या जाहीर सभेत त्यांच्यात बराच दम असल्याचे म्हटले. उपस्थितांच्या उत्साही प्रतिसादामुळे चिराग पासवान उस्फुर्तपणे राज्यातील सर्व 243 जागांवर निवडणूक लढविणार असल्याचे बोलून गेले. तसेच एनडीएला आणखी बळकट करण्यासाठीच आपण हा निर्णय घेतला असल्याचेही त्यांनी सांगितले. एनडीएसाठी त्यांनी केलेले भाष्य आपल्या पहिल्या विधानातून पळवाट काढावी, यासाठी केल्याचे म्हटले जाते.

# बंगळुरु येथील चेंगराचेंगरीसाठी आरसीबी आणि बीसीसीआय जबाबदार : कर्नाटक सरकार

**बंगळुरू :** आयपीएल 2025 मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाच्या विजयोत्सवादरम्यान बंगळुरूमधील चिन्नास्वामी स्टेडियमच्या बाहेर झालेल्या चेंगराचेंगरीत 11 जणांचा मृत्यू झाला आहे. यानंतर आता कर्नाटक सरकारने या चेंगराचेंगरीसाठी आरसीबी आणि भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) यांना थेट जबाबदार धरले आहे. या कार्यक्रमासाठी कोणतीही परवानगी घेण्यात आली नव्हती आणि आयोजकांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आख्ख्या जगाला कार्यक्रमासाठी बोलवले असे सरकारने उच्च न्यायालयात सांगितले आहे. या प्रकरणात चार याचिका दाखल करण्यात आल्या आहेत, ज्यापैकी एक आरसीबीचे मार्केटिंग हेड निखिल सोसाले यांनी देखील दाखल केली आहे. ज्यामध्ये त्यांनी या घटनेच्या पार्श्वभूमीवर त्यांना झालेल्या अटकेला आव्हान दिले आहे. या याचिकांवर सुरू असलेल्या सुनावणीदरम्यान सरकारने उच्च न्यायालयात ही भूमिका घेतली आहे. हे प्रकरण एकल न्यायाधीश एस. आर. कृष्ण कुमार यांच्यासमोर ही सुनावणी सुरू आहे. ॲडव्होकेट जनरल शशी किरण शेट्टी यांनी या प्रकरणात राज्याची बाजू मांडली, ॲडव्होकेट जनरल म्हणाले की, 'असे वाटत होते की त्यांनी आख्ख्या जगाला आमंत्रित केले आहे.' तसेच यावेळी त्यांनी आरसीबीच्या सोशल मीडिया पोस्टकडे न्यायालयाचे लक्ष वेधून घेतले. 'सर्व चाहत्यांना जल्लोष साजरा करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे, असे पोस्ट केले होते,' असेही त्यांनी सांगितले.



# पोटच्या चार मुलांना घट्ट पकडून रेल्वेच्या रुळावर पित्याती आत्महत्या

**लखनऊ :** उत्तर प्रदेशच्या फरीदाबाद येथे मंगळवारी बल्लबगड रेल्वे स्थानकाच्या जवळ रेल्वेने चिरडल्याने 36 वर्षीय व्यक्ती आणि त्याच्या 4 मुलांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान ही घटना म्हणजे हत्या आणि आत्महत्या असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या 5 जणांच्या मृत्यूनंतर या व्यक्तीच्या पत्नीची चौकशी केली त्यामध्ये या व्यक्तीला पत्नीच्या चारित्र्यावर संशय होता असे आढळून आल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. मनोज महतो हा मजूर म्हणून काम करत असे, दुपारी त्याने त्याच्या पत्नीला तो मुलांना त्याच्या फरीदाबाद येथील सुभाष कॉलनी परिसरातील त्यांच्या घराच्या जवळच्या एका पार्कमध्ये घेऊन जात असल्याचे सांगितेल होते.



# 'एमपीएससी'कडून अनेक पदांसाठी जाहिरात




**नागपूर :** महाराष्ट्र लोकसेवा आयोग अर्थात एमपीएससीच्यावतीने अनेक दिवसांपासून कुठल्याही परीक्षेसाठी जाहिरात देण्यात आलेली नाही. त्यामुळे स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी चातकासारखे जाहिरातीची वाट बघत होते. त्यामुळे एमपीएससीने अनेक दिवसांनंतर एका विभागाची पदभरती जाहीर केली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना आता अर्ज करता येणार आहे. दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वतीने गट क पदाच्या 137 पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. यासाठी उमेदवारांना 30 जूनपर्यंत अर्ज करता येणार आहे. अनेक वर्षांपासून विद्यार्थी या जाहिरातीची वाट बघत होते. मात्र, राज्य सरकारकडून मागणीपत्र दिल्यावरही आयोगाकडून जाहिरात प्रसिद्ध झालेली नव्हती. अखेर आयोगाने जाहिरात प्रसिद्ध केल्याने विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी अर्ज करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विशेष म्हणजे या पदासाठी मुंबईच्या परीक्षा केंद्रावर ऑनलाईन माध्यमातून परीक्षा होणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या अधिनस्त केवळ राज्य उत्पादन शुल्क विभागातील लिपिक संवर्ग व जवान संवर्गातील खालील पदावरील कर्मचारी प्रस्तुत परीक्षेस पात्र असतील 'लिपिक संवर्ग ' लिपिक, वरिष्ठ लिपिक, लिपिक-टंकलेखक, टंकलेखक, लेखापाल व टिप्पणी सहायक. शैक्षणिक अर्हतेसह सेवाः शासन परिपत्रक/जाहिरातीमध्ये नमूद अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास (दिनांक 30 जून, 2025 रोजी) लिपिक संवर्गामध्ये किंवा जवान संवर्गामध्ये नियमित नियुक्तीच्या दिनांकापासून खालीलप्रमाणे किमान नियमित सेवा पूर्ण होणे आवश्यक आहेः मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या कोणत्याही शाखेचा पदवीधर असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत 3 वर्षे नियमित सेवा.

# भूमिहीन कुटुंबांना मिळणार मोफत जमीन : मुख्यमंत्री नितीश कुमार

**पाटना :** निवडणुका जवळ आल्या की राजकीय पक्षाचे नेते जनतेवर आश्वासनांची खैरात करू लागतात. गेल्यावर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत राजकीय पक्षांनी मतदारांना विविध आश्वासने दिली होती. भाजपाप्रणीत महायुतीने महाराष्ट्रात लाडकी बहीण योजना राबविल्यानंतर त्याचा मोठा परिणाम निवडणुकीच्या निकालावर दिसून आला. महिला सन्मान योजनेची घोषणा केल्यानंतर राजधानी दिल्लीतही भाजपाला 27 वर्षांनंतर सत्तास्थापन करण्यात यश मिळाले. आता यावर्षीच्या अखेरीस बिहारमध्ये विधानसभा निवडणूक होणार आहेत. त्याआधी बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी भूमिहीन कुटुंबांना घरकुलासाठी मोफत जमीन देण्याची घोषणा केली आहे.



बिहारमधील निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालील सरकारने 'अभियान बसेरा योजना' पुन्हा सक्रिय केली आहे. तब्बल एक दशकानंतर ही योजना नव्याने राबवण्यात येत असून, भूमिहीन कुटुंबांना घरकुलासाठी जमीन देण्याच्या उद्देशाने सरकारकडून नवीन सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, 'अभियान बसेरा-I' अंतर्गत 2014 साली बिहारमधील एक लाख 30 हजार कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यात आले होते. त्यापैकी 93 हजार कुटुंबांना प्रत्येकी पाच डिसमिल (2,178 चौरस फूट) जमीन वाटप करण्यात आली होती. त्यातील उर्वरित कुटुंबांना या योजनेचा लाभ देण्यासाठी सरकारने आता दुसऱ्या टप्प्यातील तयारी सुरू केली आहे.

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी भूमिहीन कुटुंबियांना मोफत जमीन देण्यासाठी अभियान बसेरा योजनेची घोषणा केली आहे. बिहारमध्ये मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय ईबीसी, अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (स्ञ) समुदायाची संख्या 85 टक्के आहे. आगामी निवडणुकीत या समुदायांतील मतदारांना आपल्याकडे आकर्षित करण्याचा भाजपाप्रणीत राष्ट्रीय लोकशाही सरकारचा हा महत्त्वाकांक्षी प्रयत्न आहे.

# डोनाल्ड ट्रम्पविरोधी वक्तव्यांचा एलॉन मस्क यांना पश्चात्ताप

**नवी दिल्ली :** गेल्या दोन आठवड्यांपासून अमेरिकेसह जगभरात अचानक चर्चेत आलेला मुद्दा म्हणजे डोनाल्ड ट्रम्प व एलॉन मस्क यांचे भांडण. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत एलॉन मस्क यांनी डोनाल्ड ट्रम्प यांना पाठिंबा असल्याचे जाहीर केले होते. तेव्हापासून त्या दोघांमधील मैत्री चर्चेत आली होती. निवडून आल्यानंतर ट्रम्प यांनी अमेरिकन सरकारमध्ये एक स्वतंत्र विभाग तयार करून एलॉन मस्क यांच्याकडे त्याचे प्रमुखपद सोपवले. आता एलॉन मस्क यांनी आपल्याला पश्चात्ताप होत असल्याचे म्हटले आहे. गेल्या दोन आठवड्यांमध्ये एकमेकांवर भरपूर टीका केल्यानंतर आता एलॉन मस्क यांनी माघार घेतली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्याबद्दल आपण केलेल्या काही पोस्ट या चुकीच्या होत्या, असे मस्क यांनी ट्वीटमध्ये म्हटले आहे. 'गेल्या आठवड्यात मी डोनाल्ड ट्रम्प यांच्याबाबत केलेल्या पोस्टबद्दल मला पश्चात्ताप होत आहे. ते जरा अतीच झाल', असे मस्क यांनी बुधवारी 11 जून रोजी केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.



# बच्चू कडू यांची प्रकृती खालावली



**अमरावती :** गेल्या काही दिवसांपासून बेमुदत अन्नत्याग आंदोलन करत असलेल्या माजी मंत्री बच्चू कडू यांची प्रकृती खालावली आहे. ते सध्या आंदोलनस्थळीच असून त्यांची प्रकृती खालावल्यामुळे त्यांना पुढच्या अर्धा तास कोणालाही भेटण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे 10 जून रोजी 2 किलो वजन कमी झाले होते. आज तर त्यांची प्रकृती खालावली आहे. सध्या त्यांच्या प्रकृतीची काळजी घेण्यासाठी डॉक्टर कार्यरत आहेत. त्यांनीच पुढचा अर्धा तास बच्चू यांची कोणालाही भेट घेता येणार नाही, असे डॉक्टरांनी सांगितलेले आहे.

### शेतकरी, कार्यकर्ते गुरुकुंज मोझरी येथे दाखल

दुसरीकडे बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाची संपूर्ण महाराष्ट्रात चर्चा आहे. त्यांना पाठिंबा देण्यासाठी प्रहार संघटनेचे महाराष्ट्रभरातील कार्यकर्ते अमरावती शहरात दाखल होत आहेत. विशेष म्हणजे महाराष्ट्रातील शेतकरीदेखील बच्चू कडू यांच्या गुरुकुंज मोझरी येथील उपोषणस्थळी जमा होत आहेत. असे असताना बच्चू कडू यांची प्रकृती खालावली आहे

### तोपर्यंत अन्नाचा कण खाणार नाही : बच्चू कडू

दुसरीकडे बच्चू कडू यांनी काहीही झाले तरी मी अन्नाचा एकही कण खाणार नाही, अशी भूमिका घेतली आहे. जोपर्यंत माझ्या मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत मी माघार घेणार नाही. काहीही झाले तरी मी अन्नाचा कण खाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

### मनोज जरांगेंनी घेतली बच्चू कडू यांची भेट

बच्चू कडू यांच्या या आंदोलनाला दिवसेंदिवस पाठिंबा वाढत चालला आहे. मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे यांनी आज (11 जून) बच्चू कडू यांची भेट घेतली आहे. या भेटीत जरांगे यांनी कडू यांना आपला पाठिंबा दर्शवला आहे. तसेच सरकारने बच्चू कडू यांच्या मागणींकडे लक्ष द्यायला हवे. त्यांच्या मागण्या मान्य करायला हव्यात, असे मत व्यक्त केले.




# आता फक्त ठाकरे ब्रँडच चालणार!

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून राज्यातील राजकारणात ठाकरे बंधू एकत्र येण्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यात दोन्ही बाजूने मिळणारा प्रतिसाद पाहून ठाकरे समर्थक कार्यकर्त्यांमध्ये उत्साह वाढला आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र यावे अशी अनेक कार्यकर्त्यांची इच्छा आहे. त्यासाठी विविध शहरात बॅनर्स झळकत आहे. परंतु शिवसेना भवनाबाहेर पहिल्यांदाच ठाकरे काका-पुतण्याचा एकत्र बॅनर झळकला आहे.

येत्या 13 जून रोजी आदित्य ठाकरे यांचा वाढदिवस आहे तर 14 जून रोजी काका राज ठाकरे यांचा वाढदिवस आहे. या वाढदिवसानिमित्त दादरच्या शिवसेना भवन परिसरात उद्धव ठाकरे गटाच्या युवासेनेकडून बॅनर लावण्यात आले आहेत. त्यात विशेषतः राज ठाकरेंचा आणि आदित्य ठाकरेंचा फोटो आहे. या दोन्ही नेत्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत आता फक्त आणि फक्त एकच ठाकरे ब्रँडच चालणार असा उल्लेख बॅनरवर करण्यात आला आहे. त्यामुळे आगामी भविष्यकाळातील हे मनोमिलनाचे संकेत तर नाहीत ना असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे.

# वाचकांना आवाहन



दैनिक बहुजन सौरभची नागपूर शहरात सतत मागणी वाढत आहे. आपल्या घरी जो पेपर देतो. त्यांच्याकडे दैनिक बहुजन सौरभची मागणी करावी. आमच्या वर्तमानपत्राची स्वतंत्र अशी कोणतीही वितरण व्यवस्था नाही.

बहुजन सौरभ

दैनिक बहुजन सौरभ नागपूर शहरात सर्वच पेपर विक्री केंद्रावरती उपलब्ध आहे. याची वाचकांनी नोंद घ्यावी.

मुख्य संपादक
दैनिक बहुजन सौरभ

> समाजात समस्यांचे समाधान करण्यासाठी प्रेरणा, सामाजिक बदलाव आणि सामाजिक समृद्धी आवश्यक ...



## संपादकीय

### निरपराधांचे बळी घेणारी मुंबईची जीवनवाहिनी

मुंबई लोकलची जीवघेणी गर्दी एक मोठी समस्या आहे. दररोज लाखो लोक कामासाठी आणि इतर कामांसाठी लोकलने प्रवास करतात, ज्यामुळे प्रचंड गर्दी होते. या गर्दीमुळे प्रवासादरम्यान अनेक समस्या येतात, ज्यात अपघातांचा धोका वाढतो. लोकलची गर्दी आणि त्याचे परिणाम, प्रवासादरम्यान धोका, गर्दीमुळे लोक लोकलच्या दारावर लटकून प्रवास करतात, ज्यामुळे अपघाताचा धोका वाढतो. मुंबईची विस्तारीत उपनगरे असलेल्या दिवा-मुंब्रा दरम्यान खचाखच गर्दीने धावणाऱ्या लोकलमधील दरवाजात उभे असणारे काही प्रवासी खाली पडले आणि त्यातच काहींचे बळी गेले तर काही जखमी झाले. सोमवार हा आठवड्याचा पहिला दिवस. या दिवशी मुंबईतील उपनगरी रेल्वेगाड्या तुडुंब गर्दीला घेऊन धावत असतात. मध्य रेल्वेच्या मुंब्रा स्थानकाजवळ दोन लोकल गाड्यांतील दरवाजात उभे असलेले प्रवासी एकमेकांना घासले गेले, त्यातूनच काही जण खाली पडले व ही दुर्घटना घडली अशी माहिती सुरुवातीला पुढे आली. नेमके किती मृत्युमुखी पडले किंवा नेमके किती जखमी झाले याची माहितीसुद्धा धड मिळत नव्हती. मुंबईच्या उपनगरी रेल्वेतून रोज पंचाहत्तर लाखांहून अधिक प्रवास करतात. एवढ्या मोठ्या संख्येने प्रवाशांना घेऊन धावणारी क्षमता जगात कुठेही नसावी. रात्रीचे चार तास सोडले तर लोकल्स धावत असतात. मध्य, पश्चिम, हार्बर मार्गावरील उपनगरी सेवा ही तर मुंबईची जीवनवाहिनी आहे. आता मेट्रो, मोनो मुंबईकरांची अत्यावश्यक सेवा बनली आहे. लोकल्स आणि मेट्रो हा मुंबईकरांचा श्वास आहे. मग ही सेवा चोवीस तास तत्पर व कार्यरत ठेवणे हे जसे रेल्वेला आव्हान आहे तर रेल्वेचे कर्तव्यही आहे. याच महामुंबईतून देशाच्या खजिन्यात सर्वात जास्त महसूल जमा होतो. याच महानगरातून देशाला सर्वात जास्त जीएसटी मिळतोय. त्या बदल्यात रेल्वे मंत्रालय 75 लाख मुंबईकरांचा रोजचा लोकल प्रवास सुखाचा व्हावा म्हणून काय सेवा सुविधा देते? काही स्थानकांवर नेहमीच गर्दीचा कहर असतो. सीएसटीवरून कर्जत, कसारा, खोपोली, पनवेलला जाणाऱ्या व येणाऱ्या लोकल्स तुडुंब गर्दीने नेहमीच भरलेल्या असतात. कोंडवाड्यात जशी जनावरे असतात, त्याहीपेक्षा लोकलमधील प्रवाशांची अवस्था वाईट असते. मुंब्रा येथे कसाराहून सीएसटीकडे जाणारी व सीएसटीहून कसाराकडे जाणारी लोकल गाड्यांतील दरवाजात उभे राहून लटकून प्रवास करणारे एकमेकांना घासले गेले व त्यातले डझनभर खाली पडले असे सांगण्यात आले. धावत्या लोकलमध्ये प्रवाशांना स्वतःचा तोलही सांभाळता आला नाही, जे खाली पडले त्यांना धरून किंवा खेचून पुन्हा डब्यात आणणे इतरांना शक्य झाले नाही. या अपघातात कुणी किती जखमी झाले, कोणाचे हात-पाय मोडले, कुणाला जीव गमवावा लागला याचा तपशील नंतर येईलच, पण गर्दीने भरलेल्या लोकलमधील प्रवासी एकमेकांना घासून खाली पडले ही बाब अतिशय गंभीर आहे. ही वेळ त्यांच्यावर का आली, त्याला जबाबदार कोण? याचे उत्तर कोणी देणार नाही. रोज पोटापाण्यासाठी व रोजगारासाठी लक्षावधी मुंबईकर गर्दीने भरलेल्या लोकल्समधून दोन-अडीच तास प्रवास करीत कामावर पोहोचत आहेत आणि त्याच गर्दीतून सायंकाळी-रात्री घरी परतत आहेत. गर्दीचे दुष्टचक्र संपणार कधी? लोकल प्रवाशांना दिलासा कधी? लोकलमधून मुंबईकरांना कधी सुखाने प्रवास करायला मिळणार? सर्वसामान्य लोक कोणीही हौस म्हणून लोकलने प्रवास करीत नाहीत. स्वस्तात व जलद प्रवास करता येतो म्हणून लाखो लोक लोकल्स प्रवासाकडे आकर्षित होतात. गेल्या वीस वर्षांत मुंबईत झालेल्या रेल्वे अपघातात 51,802 लोकांचा मृत्यू झाला. सन 2025 या नवीन वर्षात जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांत मुंबईत रेल्वे अपघातात 663 लोक ठार झाले. त्यातले 272 जण लोकलमधून खाली पडून मरण पावले, तर 391 जण रेल्वे रूळ ओलांडताना मृत्युमुखी पडले. दोन लोकलमधील प्रवासी एकमेकांना घासून खाली पडून मरण पावले किंवा जखमी झाले, असे प्रथमच घडले असावे. आता तरी राज्य सरकार, केंद्र सरकार व रेल्वे प्रशासन यांचे डोळे उघडणार आहेत की नाही? मुंबईतील लोकल प्रवासावर कोणाचे नियंत्रण आहे की नाही? विनातिकीट प्रवासी हे दैनंदिन पासधारकांना रोजची डोकेदुखी असते पण धावत्या लोकलमध्ये डब्यात येऊन तिकीट तपासणी जवळपास बंदच झाली आहे. मध्य व पश्चिम रेल्वेचे टीसी जातात कुठे हा पासधारकांना रोज प्रश्न पडलेला असतो. भिखारी, फेरीवाले, विक्रेते, डब्यात गलिच्छ फडकी मारून सफाई केल्याचा आव आणणाऱ्यांची गर्दी भरपूर असते. हातात तान्हे बाळ घेऊन भीक मागणाऱ्यांची संख्याही बरीच आहे. हे सारे लोक स्टेशनात तरी कसे येतात, लोकलमध्ये कसे चढू शकतात? यांना रोखणारी, हटवणारी, व कारवाई करणारी यंत्रणा कुठे दिसत नाही. लोकलधील खचाखच गर्दीमध्ये पाकीटमार व मोबाईल चोरांच्याही टोळ्या सावज शोधत असतात. पण कुठे रेल्वे पोलिसांचा त्यांना धाक आहे असे कुठे दिसत नाही. मुंब्रा येथे गर्दीत तोल न सावरता आल्यामुळे डझनभर प्रवासी खाली पडले, ही गर्दी नियंत्रित होणार नसेल तर पुढेही असे अपघात होत राहतील. मुंबईची जीवनवाहिनी सुरक्षित राहिली पाहिजे याची जबाबदारी रेल्वे प्रशासन व रेल्वे पोलिसांची आहे. अनेकदा गर्दीमुळे लोक रुळावर पडतात, ज्यामुळे गंभीर अपघात होतात. गर्दीमुळे प्रवाशांना कामावर वेळेत पोहोचणे कठीण होते, ज्यामुळे त्यांना मानसिक आणि आर्थिक त्रास होतो. रेल्वे प्रशासन गर्दी कमी करण्यासाठी उपाययोजना करत नाही, ज्यामुळे प्रवाशांना त्रास होतो. काही वेळा सामान्य लोकल फेऱ्या रद्द करून वातानुकूलित लोकल सुरू केल्या जातात, ज्यामुळे सामान्य प्रवाशांना जास्त त्रास होतो. लोकलची गर्दी कमी करण्यासाठी उपाय म्हणून प्रवासाची वेळ बदलणे, लोकांना ऑफिसच्या वेळेत बदल करायला हवा, ज्यामुळे गर्दी कमी होऊ शकते. लोकलच्या फेऱ्या वाढवणे, नवीन लोकल सुरू केल्यास, गर्दी कमी होण्यास मदत होईल. सुरक्षित प्रवासासाठी आवश्यक सुविधा पुरवल्या पाहिजेत. प्रवासाचे नियोजन करणे आणि योग्य वेळी प्रवास करणे, यामुळे गर्दी कमी करता येऊ शकते. तात्पर्य मुंबई लोकलची गर्दी एक मोठी समस्या आहे, ज्यावर उपाययोजना करणे आवश्यक आहे. रेल्वे प्रशासन आणि प्रवाशांनी एकत्र येऊन गर्दी कमी करण्यासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत. ■ ■

## कंत्राटी कामगार मेला तरी चालेल कंत्राटदार व अधिकारी जगला पाहिजे!

भारतातील कामगारंची आणि शेतकऱ्याची फार वाईट परिस्थिती आहे. पण जे कट्टर हिंदू आहेत त्यांची नाही. 2014 नंतर 'आई जेवण घालत नाही. बाप भीक मागु देत नाही.' सर्वच जन आंदोलन करणारे आंदोलन जीवी झाले आहेत. मायबाप सरकारच काय करावे याचा मोठ्ठा पेच पडलाय जे हिंदू नाहीत त्या असंघटीत कष्टकरी कामगारांना व शेतकऱ्यांना! बेबीच्या देठा पासुन ओरडुन सांगणारे राज्यातील देवेन्द्र फडणवीस साहेब आणि देशभर शेपन्न इंच छाती फुगवुन सांगणारे नरेंद्र मोदी साहेब यांना 11 वर्षात काँग्रेस विरोधात जो प्रचार केला होता त्याची अंमलबजावणी करण्यासाठी कठीण झाले आहे. चुटकी सारखे करून दाखवू सांगणारे अकरा वर्षात काय काय केले ते देशातील तमाम कामगार कर्मचाऱ्यांना शेतकऱ्यांना समजण्या पलीकडे झाले आहे. तेव्हा काँग्रेस ही काही भाजप शिवसेने सारखी ज्वलंत हिंदुत्ववादी नव्हती. सर्वधर्म समभाव मानणारी होती. म्हणुन शेतकऱ्याची कृषी उत्पन्न बाजार समितीत हिंदुत्ववादी शेतकऱ्यांची प्रचंड लुटमारी होत होती. त्यामुळे शेतकऱ्यांच्या सोसायटी कर्जाचा डोंगर कमी होण्याऐवजी वाढत होता. तेव्हा दुष्काळ जाहीर करण्यासाठी गर्वसे कहो म्हणणारे तालुका, जिल्हा सिंह गर्जना करून हालवून ठेवत होते. आता त्यांना मंदिराबाहेर हिंदुत्ववादी शेतकरी, कर्जबाजारी शेतकरी दिसत नाही. त्यामुळे दुष्काळ जाहीर करायचा प्रश्नच उद्भवत नाही. तेव्हा विहिरींना पाणी नव्हते. आता पाणीच पाणी आहे विहीरीला, तेव्हा लाईट नव्हती आणि लाईटबील मात्र वेळेवर येत होतो. आता भरपूर लाईट आहे. त्यामुळे लाईटबिल वेळच्या वेळेला येत नाही.
शेतकऱ्यांना कर्ज देतांना सातबारा आणि ओळखीचे दोन जामीनदार लागतात. तेव्हा बँक अधिकारी कर्ज पास करतात. मग विजय मल्ल्याला कर्ज देतांना कोणते कागद पत्र आणि जामीनदार घेतले? ते सरकारी अधिकारी आणि हे सरकार का नाही जाहीर करत? हिंदुत्ववादी शेतकऱ्यांच्या थकबाकीची माहिती जामीनदारांच्या नांवासह वृत्तपत्रात जाहिरात देऊन जनतेला सांगितल्या जाते. मग हया बँक अधिकाऱ्यांच्या गुणवंता कर्तबदारीचे जाहीरपणे मूल्यमाफन का होत नाही? शेतकऱ्यांना कर्ज देणाऱ्या अधिकाऱ्यांना वेगळा न्याय आणि गरीब उधोगपतीनां कर्ज देणाऱ्या अधिकाऱ्यांना वेगळा न्याय का? कोणाची जात धर्म आडवा येतो? तिथे ज्वलंत हिंदुत्व म्हणजे राष्ट्रीय लागु होत नाही काय? शेतकऱ्यांच्या पिकाला महागाईची झळ पोचत नाही काय? शेतकऱ्यांना बि-बियाने औषध, शेतमजूर यांच्या करीता पैसा कुठून येणार? कृषिविभागतील सर्व दुकानदार, व्यापारी, अडते, दलाल यांना सर्व महागाईची झळ लागते. कृषीउत्पन्न बाजार समितीच्या माथाडी कामगारांन कडून माथाडी बोर्ड चाळीस, एकेचालीस टक्के लेव्ही कापुन घेते. त्यांचा त्या कामगारांना कोणताही फायदा मिळत नाही. त्यावर सर्व कर्मचारी, पुढारी कायम स्वरूपी मलिदा खातात. शेतकऱ्यांना जात, धर्म, प्रांत नसतो. पण राजकीय पक्षांना त्यांच्या कार्यकर्ते, नेते यांना जात, धर्म, प्रांत असते. त्यावरच ते शेतकऱ्यांचे मतदान मिळवितात. तेव्हा त्यांना लाज कशी वाटत नाही. शेतकऱ्यांच्या मतदानावर निवडून यायला. ज्यांच्या मतदानावर निवडुन येतात आणि त्यांनाच सवलती देतांना हात मोडतात. पण कंपनी, कारखाने, बिल्डर्स यांचा टॅक्स माफ करतांना मेंदू आणि हात बरोबर काम करतात. विरोधी पक्षात असतांना सत्तेच्या खुर्चीसाठी ओरडून सांगत होता, कामगार, कर्मचारी शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे. मग आता काय झाले तुमच्या डोक्यातील मेंदूला? आता त्यांची निर्णय क्षमता कोमात गेली काय? हिंदुत्व, मराठी माणस, धार्मिक भावनिक साद घालून कामगार, कर्मचारी शेतकरी नेला स्वर्गात आणि सत्ता मिळविली. आघाडीचे सरकार एकमेकांना सारखे शिव्या शाप देत होते पण सत्ता सोडत नव्हते. ते कोणते ही हिंदुत्वाचे संस्कार नसलेले बोके होते. युतीच्या सरकारात तर पिवर हिंदुत्वाचे संस्कार झाले नेते आहेत. हे त्यांच्या पेक्षा जास्त भांडतात. पण कामगार, कर्मचारी शेतकऱ्यांना मराठी माणसांना न्याय देण्यासाठी सत्तेतुन बाहेर पडत नाही. म्हणुन आता शेतकऱ्यांना स्वर्गात जाण्याकरिता आत्महत्याच करण्याची पाळी आणली राज्यकर्त्यांनी. कामगार, कर्मचारी शेतकऱ्यांचे नेतृत्व करणारे प्रामाणिक असते तर यांनी या अधिकाऱ्यांचे जगणे कठीण केले असते. आता कुठे आहेत. ते तोंडाला काळे फासणारे कट्टर हिंदुत्ववादी? कुठे आहे त्यांचा मराठी धर्म? पैसा सर्व श्रेष्ट झाला आहे. धर्माचे संस्कार, नीतिमत्ता कुठेच शिल्लक राहिली नाही. आघाडी सरकार व युती सरकार नालायक होते. तर आता महाविकास आघाडी सरकार काय आहे? म्हणजे सरकार कोणाचे ही असो. कामगार आणि शेतकरी हा भरडला जाणार असेल तर त्यांनी काय केले पाहिजे. शेतकरी कामगार पक्षातील गणपतराव देशमुख सारखा आमदार, खासदार निवडला पाहिजे. कोणत्याही राजकीय पक्षाचा नेता आमदार, खासदार नको तर शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यांचा खरा पुत्र निवडला पाहिजे. मानस पुत्रांनी शेतकऱ्यांनी नको तेवढी नालस्ती केली आणि विश्वास गमावला. म्हणुन 'जिसकी संख्या भारी उतनी उसकी भागेदारी' म्हणजे शेतकरी आणि हितकरी, बहुजन हिताय बहुजन सुखाय असलाच पाहिजे. शेतकऱ्यांनी महात्मा जोतीराव फुले यांचा आसुड हाती घेऊन कामगार, शेतकरी मेला तरी चालेल कंत्राटदार आणि अधिकारी जगला पाहिजे असे धोरण घेणाऱ्या ठेवणाऱ्यांना फोडून काढलेच पाहिजे. सर्व शेतकऱ्यांच्या वतीने सर्वच कामगार शेतकऱ्यांना प्रार्थना करतो. भटा ब्राम्हणांच्या सांगण्या वरून देवाला प्रार्थना करणे सोडा जिवंत माणसाला कामगार शेतकऱ्यांना हात जोडून प्रार्थना करा. जात, धर्म सोडा शेतीवर जगणाऱ्या सर्वच कामगार, कर्मचारी अधिकारी, शेतकरी माणसांना जोडा. आज उद्योगपती लोकांना कंत्राट दिले जाते. त्यासाठीच कंत्राटी कामगार मेला तरी चालेल कंत्राटदार आणि अधिकारी जगला पाहिजे. ही धोरण राज्य व केंद्र सरकारचे आहे. आपल्यावर त्याचा काही परिणाम होतो काय हॉट असेल तर संघटित व्हा नाही तर जी श्रीराम बोला. ■ ■





सागर रामभाऊ तायडे
9920403859

## रूढीप्रिय महिलांकरिता महत्वाचा दिवस म्हणजेच वटपौर्णिमा

वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून महिलांना प्रश्न विचारते. आज अनेक राज्यांत, गावात, खेड्यात, शहरात बऱ्याच महिलांनी वडाच्या झाडाला खुप सारे खावु घातले असणारच! आंबा, पेरू, हळद कुंकू, धागा दोरा, पाणी -प्रसाद! नंतर तो एक दिवस सोडून एरवी कोणतीच स्त्री झाडाजवळ जात नसणार पौराणिक कथा, पारंपरिक रीती, रिवाजानुसार परंपरा पाळत असल्यामुळेच वडाच्या झाडाची पूजा करून हाच नवरा जन्मो जन्मी मिळावा. त्याला दीर्घायुष्य मिळावे अशी मनोकामना स्वतःच्या पती करीता केली जाते. माझ्या घराच्या गेटच्या बाजूला लागून माझ्या शेजारी बाईने 8 वर्षापूर्वी वडाचे झाड लावले. त्या वेळेस सुद्धा मनात आलेच काही दिवसानंतर या ठिकाणी धागा गुंडाळून पुजा होणारच. शेवटी तेच झाले सावली मिळावी म्हणून वृक्षारोपण केले. आता ते वडाचे झाड बरेच मोठे झालेत. महिला माझ्या पतीला आयुष्य मिळावे म्हणून पूजा करायला येवू लागल्यात. मी मात्र मनात बडबडू लागली. कारण आधुनिक विचार सरणी असलेल्या कारणांनी. नेमक! आज काय झाले. मी निश्चय केला मी बाहेर कुठे जायचे नाही आणि महिला आल्यात काय म्हणून वारंवार गेटजवळ जावून बघायची नेमक्या महिला झाडाची पूजा करीत असताना गेटच्या बाहेरुन बघितले आणि थबकली. जावू की नको. शेवटी मैत्रिणींचा आधार घेतला आणि हिंमतीने गेली. त्याचे फोटो, रेकॉर्ड व्हिडिओ कैद केलेच. हळूच एका महिलेला प्रश्न विचारला किती वर्ष झालेत वडपूजा करिता. ती म्हणाली 14 वर्ष, बापरे किती छान तुमचा नवरा गोड गोड राहतो प्रेम करितो. तुमच्या मनाप्रमाणे सर्व ईच्छा पूर्ण करीतो. म्हणून दरवर्षी पुजा करीत असता. तर त्यावर ती बाई काय म्हणाली, 14 वर्षापासून खुपच प्रेम उतू जात आहे आणि त्यावर ती हसली आणि आम्ही पण हसलो. बोलण्यावरून सारच समजला. दुसरी म्हणाली त्यांच्या मध्ये सुधारणा व्हावी आणि उदंड आयुष्य लाभावे म्हणून ती पूजा करीते. एक नवीन लग्न होवून आली असेल. लग्नाचा लाछा घालून छान तयारी करून झाडाला धागा बांधून मस्त फेऱ्या मारत होती. सुंदररित्या पतीच्या पाया पडली. मी आणि माझी मैत्रिण बघतच राहिलो. मी मनात पुटपुटली 2 वर्ष पाया पड नंतर शिव्या दे! हे सारे मोबाइलद्वारे कैद केले. एक दिवसाकरीता केलेली वटपौर्णिमा. बघा लग्नात अवाढव्य खर्च करून विधिनुसार लग्न झाल्यानंतर दोघांचे काही झाले तर मुली म्हणतात, तुमच्यापेक्षा छान मुलगा आला होता. माझ्या नशिबात तुम्हीच भेटले. आजच्या वर्तमान परिस्थितीत आजही पतीला लांबलचक आयुष्य मिळावे. या करिता पत्नी मनोकामना करीते. मग पुरुष का करीत नाही. माझ्या पत्नीला उदंड आयुष्य मिळावे म्हणून.
कधी तरी ऐकले काय? म्हणून डॉ. बाबसाहेब आंबेडकर म्हणतात, वडाच्या झाडाला फेऱ्या मारून आयुष्यभर नवरा जिवंत राहिला असता तर महिला आणि मुली कधीही विधवा झाल्या नसत्या. अगदी खर या विषयावर थोडी चर्चा केली. त्यांनी सांगितले आताची जनरेशन नवीन मुली कोणीच फारसे करीत नाही. रूढी, परंपरा मुळे नेहमी वटपूजा करीत आलोत म्हणून करावे लागते. तब्बेत बिघडली तर काय करिता? वडाच्या झाडा खाली आणायचे तुमच्या पतीला त्यावर उत्तर दिले. आम्ही दोन्ही करीत असतो. हॉस्पिटल आणि बाकीचे. जो पती दारू पिऊन, मारीत असेल त्रास देते ती पण महिला वटपौर्णिमेच्या दिवशी नटून थटून पूजा करायला जाते. बघा किती अंधश्रद्धा आजच्या विज्ञान युगात. एकीकडे महिला नसावर जावून शोध घेते आणि दुसरीकडे वटसावित्री म्हणून पूजा केली जाते. दोन महिला पण एका महिलेत शैक्षणिक अभाव, कौटोंबिक वातावरणाचा अभाव असल्यामुळे किती फरक. सर्वात जास्त अंधश्रद्धा असेल तर महिला मध्ये. ती दूर होण्याकरीता सामाजिक बांधिलकी समजून. कटाक्षाने कार्य करण्यास तत्पर असावे. ■ ■




अंधश्रद्धा निर्मूलन समिती जिल्हा पदाधिकारी
मो. 8308169416

## आम्ही मरता मरता वाचलो...



माझी छोटी बहीण काही दिवसांसाठी नागपूरला माझ्याकडे काही तपासण्यासाठी आली होती. तिच्या तपासण्या झाल्या. तिला लहान मुलगी असल्याने एकटीला जास्त दिवस ठेऊ शकत नव्हतो. त्यामुळेच जाण्याचा निर्णय घेतला. मनात आले की मी पण तिच्यासोबत काही दिवस राहावे. म्हणून मी चंद्रपूरला जायचा निर्णय घेतला. गाडीने प्रवास सुरु झाला. ड्रायव्हर पुढे, त्याच्या बाजूला माझी लहान बहीण आणि मागच्या सीटवर मी. मी खिडकीतून बाहेर पाहत निळाशार आकाश, दूरवरच्या टेकड्या आणि मध्येच वळणावर उगवलेली हिरवीगार झाडे पाहत होते. माझ्या शेजारी काही खाण्याचे पदार्थ ठेवले होते. साधीशी तयारी, पण त्या प्रवासात खूप महत्वाची वाटणारी. थोडे अंतर पार केल्यावर वाटेत एका गाडीसाठी थांबलो. तिथे ताज्या फळांचा रस घेतला. थकलेल्या शरीरात तरतरी आली. वातावरण आल्हाददायक होते. पुढचा प्रवास सुरु झाला. वरोऱ्याला पोहोचायला साधारण वीस मिनिटे उरली होती. गाडीचा वेग सुमारच सुमारे ऐंशी होता. सगळे ठीकठाक वाटत असतानाच. अचानक एका क्षणात सगळे उलथं-पालथं झाले. गाडीच्या खाली फाटफाट, खाडखाड आवाज झाला. गाडी थोडी कलटी झाली, धस्सह्यह्य झाले. हृदयाचे ठोके क्षणभर थांबलेच जणू. ड्रायव्हरने कसेबसे स्वतःला सावरत गाडी बाजूला लावली. आम्ही सगळे घाबरून खाली उतरलो. पाहिले तर डाव्या बाजूच्या चाकांचे कव्हर निघून मागच्या कव्हरला फाडत गेलेले होते. चाक अक्षरशः फाटलेले. क्षणभर वाटले गाडी जर उलटली असती तर? आमच्या जगण्याच्या शक्यता अगदी धुसर झाल्या असत्या. आम्ही वाचलो होतो मृत्यूच्या दाढेतून थेट परतलो होतो! पण संकट संपले नव्हते. दुसरी स्टेफनी लावण्याचा आमचा प्रयत्न निष्फळ ठरला. रस्ता हा पूर्णपणे सुनसान आजूबाजूला मदतीसाठी कुणी नव्हते. वरोरा आणखी वीस मिनिटे लांब होता आणि आज बकरी ईद दुर्दैवाने जवळपास सगळी दुकाने बंद आहेत. ड्रायव्हर किडनी पेशंट आहे. तरीही आमच्यासोबत त्यानेदेखील शर्थीचे प्रयत्न केले. पण स्टेपनी बदलवण्यात आम्ही अयशस्वी ठरलो. रस्त्यावरून एक जण जातांना दिसला त्याला कसेबसे थांबवण्यात आम्हाला यश आले, ड्रायव्हर त्याच्यासह मदतीच्या आशेने निघाला वरोरा. एखादा मेकॅनिक आणायला. पण त्यालाही काही कोणी मेकेनिक भेटला नाही. तोवर काळोखही वाढत चालला होता. सुनसान रस्ता. रस्त्यावरून जाणारे येणारे विरळकच, भिती, असहायता, सगळे एकत्र झाले होते. माझ्या बहिणीने शेवटी एका ओळखीच्या व्यक्तीला फोन लावला. त्यांचे उत्तर 'हो, आम्ही त्या वाटेवरच आहोत, पण गाडी ओळखली नाही.' काही वेळात ते मागे फिरले आणि मदतीचा हात पुढे केला. तो क्षण एकदम जादुई वाटला. त्या सुनसान रस्त्यावर, त्या संकटात, अचानक कोणी तरी 'देवमाणूस' आपल्यासाठी धावत येतो आहे आणि अंधारात पुन्हा आशेचा किरण दिसतो. त्यांनी सहजच शिताफीने स्टेफनी लावली, गाडी सज्ज झाली आणि आम्ही पुन्हा मार्गस्थ झालो. चार तास... एका सुनसान रस्त्यावर, एका अपघाताच्या कड्यावर उभे राहून आम्ही फक्त श्वास घेत नव्हतो तर आम्ही जगत होतो. हिरवेगार उंचच उंच झाडे, सोसाट्याचा वारा. त्यावर तो सू सू करणारा आवाज सगळेच कसे शब्दातीत होते. हा अनुभव फक्त अपघातातून वाचल्याचा नाही, तर हा अनुभव आहे जिवाच्या टोकावरून परतण्याचा, माणुसकीच्या मृदु स्पर्शाचा आणि 'यालाच आपण देवमाणूस म्हणतो का?' या प्रश्नाचे सजीव उत्तर मिळाल्याचा, आनंदाचा... ■ ■

> आयुष्यात काही क्षण असे येतात, जे फक्त आठवण म्हणून राहत नाहीत... ते आत्म्याला हादरवून टाकतात, डोळ्यासमोर पुन्हा पुन्हा उभे राहतात...

मीनाक्षी दमयंती,
मो. 8275952542

## लढण्याची तयारी आहे : लोकनेता सुखदेवबाबु उईके

**विदर्भ ही संत, महंत, नेते, पुढारी, कवी, लेखक, कलावंतांची पवित्र भूमी आहे. अकरा जिल्ह्याचा मिळून बनलेला विदर्भ 'गोंडवन' प्रदेशात समाविष्ट होता. चंद्रपूर(पूर्वीचे चांदा फोर्ट/चांदागढ) हे ऐतिहासिक शहर म्हणून विदर्भात ओळखले जाते. जिल्हा चंद्रपूर, वरोरा तालुक्यातील मांगली खेडेगावात सुखदेवबाबु उईके यांचा जन्म 5 फेब्रुवारी 1932 रोजी झाला.**

वडील पुंडलीक दामोधर उईके तर आईचे नाव कान्हाबाई. खेडेगावातच सुखदेव यांचे बालपणे गेले. वडील जंगल खात्यात वनरक्षक पदावर कार्यरत असल्याने त्यांची बदली खेडेगावातच होत असे. एक कोस दूर असलेल्या डोंगरगाव येथे पहिल्या वर्गात सुखदेव चे नाव शाळेत दाखल करण्यात आले. दररोज पायवाटेने जवळपास 3 कि.मी. पैदल शाळेत शिक्षणासाठी जात होते. सुखदेव यांना एक भाऊ व एक बहिण होती. वडिलांचे मूळगाव चिमूर होते. नौकरी करतांना जंगल खात्यात वारंवार खेडेगावी बदली होत असल्याने मुला-मुलींना शिक्षण देणे तथा त्यांच्याकडे लक्ष पुरविणे वेळेअभावी दुर्लक्ष होऊ नये म्हणून तीन अपत्यांना स्वगावी चिमूर येथे आत्याकडे शिक्षणासाठी पाठविण्याचे निश्चित झाले. चिमूर येथे आत्याच्या घरी राहून सुखदेवचे प्राथमिक शिक्षण झाले. आईचे मन मुलांवाचून रमेना म्हणून वरोरा येथील नेताजी हायस्कूलमध्ये पाचव्या वर्गात सुखदेव याचे नाव दाखल करण्यात आले. वरोरा येथील भाड्याच्या खोलीत आईसोबत तीनही अपत्ये राहून शिक्षण घेत होते. मुलांच्या बालमनावर आईच्या संस्कारामुळे मुले शिकू लागले. आईच्या सहवासात लहानाचे मोठे होऊन खूप शिकावे अशी प्रत्येक आईवडिलांची ईच्छा असते. मायेची ममता तथा मार्गदर्शनामुळे तीन भावंडे शिक्षण घेत होते. हसत खेळत शिक्षणाचे कार्य तथा आईच्या निरागस प्रेमात मुले पुढे पुढे जात असतात. आईवडीलांच्या स्वप्नांची तथा स्वतःच्या विकास व प्रगतीचे मार्ग शिकणारी मुले शोधत असतात. बालपणी आई ही मुलासाठी जीव ओतून कार्य करीत असते. आई सर्व स्तरांवर जतन व संवर्धन करण्याचे धाडस करीत करीत जीवन संघर्ष करीत मुला-मुलींचे जीवन घडवीत असते. परिवर्तन हा सृष्टीचा नियम आहे. सर्व दिवस समान नसतात. पुढे काय होणार? हे सांगता येत नाही. प्रसंग येतात आणि जातात. असाच एक प्रसंग कायमचे दुःख देऊन गेला. अकस्मात अतिवृष्टीमुळे राहत्या घराची भिंत कोसळली अन त्यात सुखदेवची माय गंभीर जखमी झाली. मुले मुलेच असतात. काय करावे सुचेना. दवाखान्यात भरती करण्यात आले. उपचार करीत असतांना मायची प्राणज्योत मालवली. सुखदेव सहीत सर्व भावंडे आईविना पोरके झाले. नको ते घडले. दुःखद प्रसंगातून बाहेर निघणे कठीण झाले. आईविना घर रिकामे झाले. कायमची आई मुलांना सोडून जाणे हे दुःख सुखदेव सहीत सर्वांना विसरणे कठीण झाले. तरीपण सुखदेव दुःखद प्रसंगात सातवीची परिक्षा उत्तीर्ण झाले, हे विशेष. याच दरम्यान वडीलांची बदली सत्र सुरू झाले. बल्लारशा येथे बदलीमुळे पूर्ण कुटूंब हलविण्यात आले. आईचे दुःख, शिक्षणाचे प्रश्न, वडील नौकरी करावे की मुलांना वेळ द्यावे इत्यादी प्रश्न मोठा मुलगा सुखदेव यांना भेडसावत होते. चिंतेचे सावट अंधाराकडे खुणावित होते. परंतु आईवडिलांच्या प्रेरणेने मला दुःखातून बाहेर पडणे अत्यावश्यक होते, काही केल्याविना मार्ग सुचत नव्हते! आईच्या दुःखाचे सावट, भुतकाळाच्या आठवणी, लहाणपणी मायेचे पदर हरवले आणि आमच्या अंधार युगाला प्रारंभ झाला. 'केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे' या उक्तीनुसार मला शिक्षणाची आवड होती. शिक्षणावाचून पर्याय नाही हे मला कळले. माझे वडील माझ्या शिक्षणाविषयक जागरूक होते. माझ्यासाठी त्यांची धावपड आणि जीव सतत मोठा मुलगा म्हणून गुंतला होता. आम्हा सर्व भावंडावर असीम प्रेम होते. आई गेल्यापासून आम्हा भावंडावर खूप खूप प्रेम करायचे. परंतु त्यांचे दुःख त्यांनी कधीच आमच्या समोर प्रदर्शित केले नाही हा त्यांचा मनाचा मोठेपणा मला मोठा मुलगा म्हणून भासू दिले नाही. आदिवासी समाजाच्या समग्र उत्थानासाठी, ज्यांची महती होती असे आदिवासी समाजाचे झुंजार नेते म्हणजे क्रांतीवीर नारायणसिंहजी उईके. सामाजिक कार्यात अभिरूची असलेले क्रां. नारायणसिंहजी उईके, चंद्रपूर येथील ज्युबिली हायस्कूल मध्ये शिक्षक होते. त्यांना समाजकार्यात आवड असल्यामुळे तथा आदिवासी समाजाच्या समस्याकडे दुर्लक्ष होते. म्हणून सरकारी नोकरी (शिक्षक पद) सोडून ते समाजकार्यात गुंतले. आदिवासी समाजातील होतकरू, हुशार, बुद्धीवंतांना शिक्षण मिळावे म्हणून आदिम समूहांच्या विद्यार्थ्यांसाठी 'जयसेवा' नावाचे वसतीगृह सुरू केले. त्यानंतर चंद्रपूर येथील न्यू इंग्लिश हायस्कूल खाजगी शाळेत शिक्षक म्हणून नोकरी स्विकारली. आदिवासी मुला-मुलींना शिक्षण मिळावे तथा समाजात प्रबोधन, मार्गदर्शनासाठी समाजसेवेचे व्रत जीवनाच्या अंतापर्यंत करीत होते. क्रां. नारायणसिंह उईके यांच्या कार्याची महती पुंडलीक उईके यांना असल्यामुळे त्यांनी भेट घेण्याचे ठरविले. अचानक एक दिवस पुंडलीक उईके यांनी सुखदेव यांच्या शिक्षणासाठी छात्रालयात प्रवेशाबाबत क्रां. नारायणसिंह उईके यांना विनंती केली. त्वरित वडिलांच्या विनंतीला होकार दिला. सुखदेव यास ज्युबिली हायस्कूल येथे आठव्या वर्गात चंद्रपूर येथे प्रवेश निश्चित झाला आणि राहण्याचा प्रश्न जयसेवा छात्रावास चंद्रपूरला झाले. सुखदेव उईके यांच्या जीवनातील, विद्यार्थी असतांना सुखद आनंद देणारा हा क्षण होता. आईचे दुःख मनात बंदिस्त करून ज्ञान मंदिराकडे वडिलांच्या अथक परिश्रमामुळे वळले. विद्यार्थी दशेत सुखदेव उईके अभ्यासू, मनमिळावू, उत्साही, जिद्दी आणि कठोर परिश्रम घेणारा होता. अभ्यासाकडे विशेष लक्ष पुरविण्यासाठी मन फक्त अभ्यासात केंद्रित करून पुढे पुढे शिक्षणाची पायरी चढत गेले.

क्रमशः ■ ■

### आदिवासी अस्तित्व



प्रा. डॉ. वामन शेळमाके
9420973248

## नेत्ररोग तज्ञ यांचा ८३ व्या वर्षात पदार्पण



### डॉ. पुंडलीक घोरपडे

गरीब कुटूंबात जन्म झाला. लहानपणी वडिलांचा मृत्यू झाला. काका गोविंदराव व आई बेगाबाई यांच्या अथक परिश्रमाने काटोल येथून दहावीची परिक्षा उत्तीर्ण केली.
डॉ. साहेबांनी शासकीय मेडिकल कॉलेज नागपूर येथून 1968 ला एमबीबीएस डिग्री घेतली. शासकीय नोकरीत राहून 1982 ला एमएस केले. 1983 पासून राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हा नेत्र तज्ञ म्हणून संपूर्ण विदर्भात नेत्र शिबीरे आयोजित करून तळागाळातील उपेक्षित व सर्वस्तरीय लोकांना न्याय दिला. या माध्यमातून त्यांनी 22 हजार नेत्र शस्त्रक्रिया करून त्यांना दृष्टी प्रदान करण्यासाठी बहूमोल कार्य केले. दि दि. 12/06/2024 ला शेड्यूल्ड कास्ट व बुद्धिस्ट पेंशनर्स असोसिएशन बजाज नगर, करूणा भवन येथे मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते त्यांच्या 61 व्या जन्मदिनानिमित्त नागरी सत्कार करण्यात आला. 2002-03 मध्ये महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम तर्फे (नागपूर मंडल) तर्फे 'प्रशस्तीपत्र' देऊन गौरविण्यात आले. 12 जून 2004 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान नागपूर तर्फे गौरविण्यात आले.



एआयएसएफ वैद्यकिय समिती, कोल्हापूरच्या वतीने 24 जाने. 2023 ला खुलताबाद, संभाजीनगर (औरंगाबाद) येथे 'भारतभुषण पुरस्कार 2023' राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. नालंदा वेलफेअर असोसिएशन मुंबई तर्फे दि. 21 एप्रिल 2024 ला 'नालंदा समाजरत्न पुरस्कार' सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई येथे प्रदान करण्यात आला. 82 व्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन! हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक :- संजय पेपर एजन्सी, खामला, खामला पंचकमेटी, खामला. महात्मे नेत्र संस्थाच्या वतीने अनेक नेत्र तपासणी व नेत्र शस्त्रक्रिया शिबीरांचे आयोजन करून अनेक गरजवंतांना दृष्टी प्रदान करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेत. ■ ■

- संजय कोठारे
खामला पंचकमेटी अध्यक्ष
मो.9309812077

“ बुद्धिमत्ता म्हणजे माहितीचे योग्य वापर करणे. ”



# शोक सभा एक शोकांतिका

*‘धर्माला ग्लानी का येते?’ असा एक प्रश्न ‘मिलिंद प्रश्न’ या ग्रंथात मिलिंद राजाने नागसेन बौद्ध भिक्खूला आपल्या वादविवादात शेवटी शेवटी विचारलेला आहे. त्याचे उत्तर नागसेनाने आपल्या उत्तरात दिलेले आहे. ते असे की, धर्माचा पायाच कच्चा असेल, धर्माला बुद्धिवंत चांगले प्रचारक नसतील व धर्म अंधश्रद्धेच्या आहारी गेलेला असेल तर धर्माला ग्लानी येते. असे सांगितलेले आहे.*

या उत्तराचा आजच्या समाज धम्मत्त्वज्ञानासी पडताळणी केली तर, धर्माला ग्लानी आणणारे व आंबेडकरी चळवळीचा गाडा पाठीमागे नेण्यात व रेटण्यात आजच्या बोलक्या सुधारणांचा सर्वात मोठा हात आहे असे वाटते. कारण आज बौद्ध समाजा बरोबरच इतरही समाज धर्म तत्वज्ञानाच्या वाटेवर चालतांना दिसत नसून तो राजकारणाच्या वाटेवरच जास्त चालताना दिसतो आहे. त्यात ‘पाठीत दोन लाता हाना, पण मला पुढारी म्हणा’ अशा वृत्तीच्या माणसांची संख्या प्रमाणापेक्षा समाजात वाढलेली आहे. याला बौद्ध समाजही अपवाद नाही.

हिंदू धर्मातील धर्मबांधव निदान अखंड हरिनाम सप्ताह भरवून व दहाव्याला एखादा धर्म प्रवचनकार आणून आपला धर्म जपत आहेत. पण बौद्ध समाजाकडे किंवा बौद्ध समाजाला आजून आपले स्वतःचे धम्मप्रवचनकारही तयार करता आलेले नाहीत. बौद्ध समाजाने बौद्धांचार्य तयार केले पण किती जलदान विधीला धम्म प्रवचन देतात हा मोठा संशोधनाचा विषय आहे. कारण आपले बरेच धम्मबांधव आपल्या घरातील एखादा माणूस मरण पावला की, लगेच त्याच्या अंतविधीचा बॅनर छापून व त्यावर आपली नावे टाकून लगेच चौकात किंवा रस्त्यावर लावतात. एवढेच नाही तर जलदानविधीचा बॅनर छापतील, पण त्यावर बौद्धाचार्याचे नाव कधीच छापणार नाहीत. मग आयत्या वेळी या किंवा त्या बौद्धाचार्याला फोन करण्यात व वेळ घालवतील. तसेच जलदानविधीला सफेद, पांढरेशुभ्र नवीन कपडे घालून असे काही. आनंदाने हजर राहतील की, पहाणारालाही प्रश्न पडतो की, आपण जलदानविधीला आलोय की मंगल परिणयाला? जलदानविधी बौद्धाचार्य संपवायच्याच अगोदर काही महाभाग त्याला सांगतात की, जरा लवकर आवरा, लय फाफट पसारा लावू नका. शोकसभेला वेळ रहात नाही. मग वक्ते निघून जातात. म्हणजेच धम्मविधीच्या गाथांना व बौद्धाचार्याला या जलदानविधीत कोणतीच किंमत नसते. असते ती फक्त या वाचाळवीरांना. त्यातही




काही वाचाळवीर तर, ‘माझे नाव लवकर पुकारा, मला काम आहे व मला लवकर जायचे आहे.’ असे सांगतात किंवा बौद्धाचार्याच्या कानात अगोदरच तसे सांगून ठेवतात.’

दीपक गायकवाड
मो. 9765046493

तेव्हा धम्मप्रवचनाचा तर काही संबंधच येत नाही. यामुळे धम्मप्रवचनकार कोणी बोलतच नाही. पण यामुळे धम्माला ग्लानी येते याचा कोणी विचारच करत नाही. कारण धम्माचा गाडा डॉ. आंबेडकरांच्या विचारांनी पुढे न्यायचा असेल तर, जलदानविधीत धम्मप्रवचन होणे अत्यंत गरजेचे आहे. कारण धम्म प्रवचन करण्याचे व सांगण्याची बौद्ध धम्माची तीनच स्थाने आहेत व ती म्हणजे एक जलदानविधी व दुसरा वास्तूशांती व तिसरा धम्म परिषद होय. पण या तिन्ही ठिकाणी बौद्ध बांधव बोलक्या वाचाळपंथी वीरांना, राजकारण्यांना व बाजारबुजण्या वक्त्यांना किंमत देतात व धम्माला गौण मानतात.

यामुळे धम्माला ग्लानी येत असून धम्माचा गाडा पाठीमागे चालला आहे. धम्म हा प्रत्येकाने अनुसरण करण्याचा मार्ग असून, त्यासाठी चांगले धम्म प्रवचनकार समाजात निर्माण करणे हि बौद्ध म्हणून बौद्ध समाजाचीच जबाबदारी आहे. यासाठी समाजानेच धम्म कार्यातून बोलक्या सुधारकांना बाजूला करून, कर्त्या सुधारकांना संधी दिली पाहिजे. तरच धम्मला आलेली ग्लानी थांबेल व धम्म वेगाने पुढे जाईल आणि आपल्या बापाचे स्वप्न पूर्ण होईल, असे मला वाटते. ■ ■

## ताटातुट

## अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

बऱ्याच लग्नसमारंभाच्या निमित्ताने आपण मंगल कार्यालयात जातो. तसेच कधी मंदिरात जातो. मंगलकार्यालयात लग्नसमारंभ पार पडल्यानंतर जेव्हा आपल्या लाडक्या लेकीला सासरी पाठवण्यासाठी निरोप दिला जातो तेव्हा सर्वांना कसे गलबलून येते. एकमेकांना मारलेल्या घट्ट मिठ्या अन् आलिंगने बघतांना भावनिक होतो. तसेच एखाद्या मंदिरात नवस फेडण्यासाठी किंवा आपल्या मनोकामना पूर्ण करण्यासाठी प्रार्थना केली जाते. हे सर्व आपण जवळून पाहिले आहे. पण मंगल कार्यालयातील आलिंगना एवढेच रेल्वे स्टेशन, विमानतळ, बस स्टॅंडवरील आलिंगने तेवढीच अस्वस्थ करतात. तसेच मंदिरातील प्रार्थनेपेक्षाही दवाखान्यातील प्रार्थना काळजाला चिरून टाकतात. ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे कुणालाही जिवाभावाच्या व्यक्तींची ताटातुट नको असते. कुणी आपल्याला सोडून जात आहे ही भावनाच आपल्याला सहन होत नाही.

‘साहिल से खुदा हाफिज जब किसीने कहा होगा,
ना जाने डूबनेवाले का हाल क्या हुआ होगा !
मील मील के गले जब कोई रूखसत हुआ होगा
तो दुश्मन से भी ये मंजर देखा ना गया होगा’

अशीच भावना प्रत्येकाच्या मनात ऊफाळून येते.

तर जिवलग व्यक्तीला निरोप देतांना हाच एकमेव विचार मनात घोळत राहतो,

‘वो दिल दिल ही नहीं
जो तुझसे मिलने की दुआ ना करें
मैं तुझको भूलकर जिंदा रहूँ, खुदा ना करें!
ये हक़ीक़त है कि, नहीं मरता कोई जुदाई में,
खुदा मगर किसीको किसीसे जुदा ना करें’

खरंच विरहवेदना भावनिक व्यक्तींना असह्य होतात. म्हणूनच जे क्षण आपण एकमेकांच्या सहवासात घालवतो ते क्षण आनंदात घालवावे. कोण म्हणतो की, काळ हा वेगाने पुढे सरकत असतो? जर एखाद्या दुर गेलेल्या व्यक्तीचा ‘मी भेटायला येणार’ असा निरोप येतो तेव्हा वाटेवर डोळे लावून बसलेल्या व्यक्तीला विचारा, तो सांगेल की, एक-एक क्षण कसा कासावीस करतो. एक एक क्षण कसा एक एका युगासारखा वाटतो.

ह्या दुर गेलेल्या व्यक्ती. ■ ■

बहुजन सौरभ

# जातीअंत की जाती पुरूज्जीवन ? (भाग -5)

*(चेन्नई, तामीळनाडू येथे 1 मे 22 रोजी संपन्न झालेल्या सामाजिक न्याय परीषदेत निमंत्रित वक्ते प्रा. श्रावण देवरे यांचे भाषण झाले. या इंग्रजी भाषणाचा मराठी अनुवाद लेखस्वरूपात देत आहोत. कार्यक्रमात वेळेचे बंधन असल्याने भाषण संक्षिप्तच करावे लागते. मात्र अनेक हितचिंतकांनी विनंती केली की, हे भाषण लेखस्वरूपात सविस्तर लिहावे. त्यांच्या विनंतीवरून हे भाषण विस्तारीत केले असून आपल्या वाचकांसाठी सादर करीत आहे. - संपादक)*

आरक्षण कायद्याला कोर्टातून स्थगिती देण्यामागे तामीळनाडूमधील कॉंग्रेसचे ब्राम्हण नेते असल्याचे स्पष्ट होताच सामी पेरियार संतापले व त्यांनी कॉंग्रेसकडे मागणी केली की पक्षाने आरक्षणविषयक धोरण जाहीर करावे. त्याकाळी सामी पेरियार हे कॉंग्रेसचे फार मोठे नेते मानले जात होते. त्यांना दक्षिणेकडचे महात्मा गांधी समजले जात होते. सामी पेरियार कॉंग्रेसच्या प्रत्येक अधिवेशनात आरक्षणाचा ठराव मांडत होते व प्रत्येकवेळी हा ठराव कॉंग्रेसचे नेते फेटाळून लावीत होते. मात्र 1925 साली कॉंग्रेसच्या वार्षिक अधिवेशनाला जातांना त्यांनी आरक्षणाच्या ठरावासोबत आपला राजीनामाही नेला होता. या अधिवेशनात त्यांनी निक्षून सांगीतले की, ‘एकतर आरक्षणाचा ठराव मंजूर करा अथवा माझा राजीनामा घ्या!’ कॉंग्रेसच्या या अधिवेशनात नेहमीप्रमाणे आरक्षणाचा ठराव नामंजूर झाला व सामी पेरियार यांनी स्टेजवरच्या नेत्यांच्या तोंडावर राजीनामा फेकत कॉंग्रेसला लाथ मारली. जस्टीस पार्टीचे सरकार सत्तेत असतांना आरक्षण कायद्याला स्टे मिळालेला होता. सामी पेरियार यांनी कॉंग्रेसच्या बाहेर पडताच ‘स्वाभिमानी चळवळ’ (Self-Respect Movement) सुरू केली व ब्राम्हणी संस्कृतीविरुद्ध युद्ध पुकारले. सामी पेरियार यांनी संपुर्ण मद्रास प्रांत ढवळून काढला व आरक्षण कायद्याला पाठींबा मिळविण्यासाठी जनजागृतीच्या महासभा घेतल्या. या महासभांमध्ये पेरियार ब्राम्हणी धर्म, ब्राम्हणी संस्कृती व ब्राम्हणांच्या देवी-देवतांना ठोकरून लावत होते. याचा परिणाम असा झाला की, जनतेच्या प्रचंड पाठींब्यामुळे 1927 साली आरक्षणाचा कायदा पुन्हा लागू झाला. जस्टिस पार्टी केवळ सामाजिक व राजकीय चळवळ चालवीत होती. धर्म, संस्कृती, रूढी-परंपरा, जातीव्यवस्था याबाबत त्यांचे कोणतेही धोरण नव्हते. सामाजिक चळवळ केली तर आरक्षण वगैरे मिळते, राजकीय चळवळ केली तर राजकिय सत्ता मिळते म्हणजे मंत्री-मुख्यमंत्री आदि पदे मिळतात. मंत्री किंवा मुख्यमंत्री म्हणून घेतलेल्या आरक्षणासारख्या महत्वाच्या निर्णयांना ब्राम्हणांकडून लगेच स्थगिती येते व सत्तेत बसलेले लोक रिकामे हात चोळत बसतात. परंतू सामाजिक व राजकीय चळवळीसोबत सांस्कृतिक चळवळही केली तर तुमच्या हातात सर्वंकष सत्ता (Absolute Power) परिपूर्ण शक्ती तुमच्या हातात येते. जस्टीस पार्टीने सत्ता मिळताच 1921 साली आरक्षणाचा कायदा केला, मात्र ब्राम्हणांनी या आरक्षण कायद्याला लगेच स्थगिती मिळवीली. 1925 पासून ब्राम्हणी कॉंग्रेसला लाथ मारून सामी पेरियार यांनी ब्राम्हणी संस्कृतीविरोधात युद्ध पुकारताच दोन वर्षांच्या आत गेलेले आरक्षण परत मिळविले. मात्र जस्टीस पार्टी तरिही सामाजिक-राजकीयच राहीली. परिणामी 1937 साली जस्टीस पार्टी सत्तेतून हद्दपार झाली ब्राम्हणी कॉंग्रेस सत्तेत आली. सामी पेरियार यांच्या ब्राम्हणविरोधी स्वाभिमानी चळवळीच्या दबावाखाली कॉंग्रेसला सुद्धा तामीळनाडूमध्ये ओबीसी मुख्यमंत्री करावे लागलेत. के. कामराज त्यापैकी एक होते. कामराज हे करूणानिधीं-स्टॅलिनप्रमाणेच अति अल्पसंख्य (MBC) ओबीसी होते, म्हणजे ते नाभीक, धोबी, लोहार, सुतार आदि बलुतेदार जातींपैकी एक होते. 26 जानेवारी 1950 रोजी संविधान लागु होताच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला नवा आरक्षणाचा कायदाही लागू झाला. डॉ. बाबासाहेबांच्या या आरक्षण कायद्याप्रमाणे संपूर्ण देशात व प्रत्येक राज्यात फक्त दलित व आदिवासी यांनाच आरक्षण मिळत होते. ओबीसी व मुसलमान यांना आरक्षण मिळत नव्हते. फक्त तामीळनाडू राज्याने संविधानाला न जुमानता आपल्या 1921 च्या कायद्यानुसार 1927 पासून ओबीसी, मुसलमान यांचेही आरक्षण चालू ठेवले होते. भारतात संविधान

आजचा कळीचा प्रश्न



प्रा. श्रावण देवरे
मो. 7588072832

26 जानेवारी 1950 पासून लागू झाल्यावरही तामीळनाडूमध्ये 1921 च्या कायद्यानुसार सर्व नॉन-ब्राम्हीण जातींना व सर्व नॉन-ब्राम्हीण धर्मांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण मिळत होते. संविधानात धर्माच्या आधारावर आरक्षण मिळत नाही. ज्या ज्या राज्यांनी मुसलमानांना आरक्षण देण्याचा प्रयत्न केला, सुप्रिम कोर्टाने ते ताबडतोब रद्द केले. मात्र तामीळनाडू राज्याने संविधानाच्याही पुढे जाऊन मुसलमानांना 1927 पासून आरक्षण देणे सुरू ठेवलेले आहे. आजही तामीळनाडूत मुसलमानांना स्वतंत्रपणे 3.5 टक्के आरक्षण मिळते आहे आणि सुप्रिम कोर्ट हे आरक्षण रद्द करण्याची हिम्मत करू शकलेले नाही. ओबीसी आरक्षण फक्त तामीळनाडुमध्येच असल्याने बाकी इतर राज्यातील ब्राम्हणांना दलित-आदिवासी आरक्षणापासून काही त्रास नव्हता, त्यामुळे या राज्यातील ब्राम्हणांनी आरक्षण कायद्याला आव्हान दिले नाही. मात्र ओबीसी आरक्षण फक्त तामीळनाडूतच असल्याने तामीळनाडूच्या ब्राम्हणांनी आरक्षण कायद्याला कोर्टात आव्हान दिले. केवळ ओबीसी आरक्षणाला आव्हान देऊन काहीच उपयोग नाही, हे ब्राम्हणांना माहीत होते. म्हणून तामीळनाडूच्या ब्राम्हणांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानातील आरक्षण कायद्यालाच कोर्टात आव्हान दिले. संविधानातील डॉ. बाबासाहेबांचा आरक्षण सिद्धांत रद्द झाला तरच दलित-आदिवासींसोबत ओबीसींचेही आरक्षण आपोआप रद्द होईल, असा विचार करून तामीळनाडूचे ब्राम्हण संविधानालाच आव्हान द्यायला निघाले. ना रहेगा बास, ना बजेगी बांसरी. डॉ. बाबासाहेबांच्या आरक्षण कायद्याला तामीळनाडूच्या ब्राम्हणांनी हायकोर्टात आव्हान दिले व हायकोर्टाने कोणताही विलंब न लावता नेहमीप्रमाणे हा




आरक्षण कायदा रद्द केला. संविधान लागु झाल्यावर सहा महिन्याच्या आतच डॉ. बाबासाहेबांचा संवैधानिक आरक्षण-कायदा रद्द झाला. सुप्रिम कोर्टानेही मद्रास हायकोर्टाचा निर्णय उचलून धरला व संपूर्ण देशातील दलित-आदिवासी व ओबीसींचे आरक्षण रद्द करण्याचा हुकूम केंद्र सरकारला दिला. दिल्लीत सरकार कॉंग्रेसचे होते व प्रधानमंत्री ब्राम्हण जातीचे नेहरू होते. नेहरूंनी त्वरीत सुप्रिम कोर्टाच्या निर्णयानुसार संपूर्ण देशातील दलित-आदिवासी-ओबीसी आरक्षण नष्ट करण्याच्या तयारीला लागलेत. त्यावेळी फक्त तामीळनाडूच्या ओबीसींनी सुप्रिम कोर्टाला व प्रधानमंत्र्याला मैदानात उतरून आव्हान दिले.

तामीळनाडूच्या अब्राम्हणी जनतेवर सामी पेरियार यांचाच प्रभाव असल्याने गावागावात लोकांनी रस्त्यावर उतरून आंदोलने केलीत. सुप्रीम कोर्टाच्या जजमेंटविरोधात ब्राम्हणेतर (ओबीसी) जातींचे आंदोलन इतके तीव्र झाले की, नेहरूंच्या दिल्ली सरकारला या ओबीसी आंदोलनापुढे झुकावे लागले. नेहरूंनी आपला केंद्रीय दूत म्हणून सरदार पटेलांना तामीळनाडूत पाठविले. सामी पेरियार यांनी पटेलांच्या माध्यमातून केंद्र सरकारला आदेश दिला की, ‘त्वरीत घटनादुरूस्ती करा व आमचे हक्काचे आरक्षण आम्हाला परत द्या!’ पेरियार यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी नेहरूंना त्वरीत करावी लागली. नेहरूंनी 10 मे 1951 रोजी त्वरीत पार्लमेंटचे अधिवेशन बोलावले व नवे विधेयक मांडुन नवा कायदा केला. ■ ■

## समाजात प्रबोधन करणाऱ्या प्रामाणिक आणि सुज्ञ बुद्धिजीवींनो

तुमच्या सभोवतालच्या लोकांना सक्षम बनवा.
तुमच्या सभोवतालच्या लोकांना सामाजिक बनवा.
तुमच्या सभोवतालच्या लोकांचे मानवीकरण करा.
तुमच्या सभोवतालच्या लोकांचे लोकशाहीकरण करा.
तुमच्या सभोवतालच्या लोकांना धर्मनिरपेक्ष बनवा.
तुमच्या सभोवतालच्या लोकांना क्रांतीकारक बनवा.
तुमच्या सभोवतालच्या लोकांना राष्ट्रीय बनवा.
तुमच्या सभोवतालच्या लोकांना भारतीय बनवा.
तुमच्या सभोवतालच्या लोकांना एकत्रित करा.
तुमच्या सभोवतालच्या लोकांना तर्कसंगत बनवा.
तुमच्या सभोवतालच्या लोकांना आधुनिक बनवा.
तुमच्या सभोवतालच्या लोकांना संवेदनशील बनवा.
तुमच्या सभोवतालच्या लोकांमध्ये वैज्ञानिक विचार रुजवा.
तुमच्या सभोवतालच्या लोकांना संवैधानिक बनवा.
तुमच्या सभोवतालच्या लोकांना शिक्षित करा.
तुमच्या सभोवतालच्या लोकांना संघटित करा. ■ ■



बलदेव आडे
मो.9890914480

# जीवनभर ज्या समाजाशी संघर्ष होता त्यालाच फाशीच्या फंद्यातुन मुक्त केले!




ते म्हणायचे, माझे संपूर्ण जीवन संघर्षमय होते, हा संघर्ष आधी ही होता आणि मी गेल्यानंतर ही राहील. परंतु हा संघर्ष कोणत्याही जाती वर्ग विशेष धर्म संप्रदायाशी कदापी नाही. हा संघर्ष मात्र त्या अमानवीय विषमतेशी आहे, जी बुद्धाच्या समतेच्या विरुद्ध आहे. दि. 9/10/1938 (म्हणजे 85 वर्षापूर्वी) दक्षिण सोलापूर येथे 1936 मध्ये शिवप्पा पुंडलिक पाटील या मराठा समाजाच्या तरुणावर खुनाचा आरोप होता. ब्रिटिश सत्र न्यायालयने त्यांना फाशीची सजा ठोठावली, आपल्या मुलाला विनाकारण फाशीची सजा देण्यात आली हा अन्याय आहे मला न्याय पाहिजे असे बोलत पुंडलिक पाटील न्यायालयात रडायला लागले कारण शिवप्पाची बायको ही नुकतीच बाळंत झाली होती आणि शिवप्पाचा मुलगा हा फक्त 11 महिन्याचा होता त्या मुलाला शिवप्पाने सुद्धा बघितले नव्हते फक्त त्याला जेलमध्ये सांगण्यात आले होते तुझ्या पत्नीला मुलगा झाला आहे. शिवप्पाचा बाप हा गावचा पाटील होता. पैसा, संपत्ती खूप होती मानसन्मान, उठ बस वैगरे गावात चांगली होती. त्यामुळे पुंडलिक सिद्दपा पाटील (शिवप्पाचे वडील) यांनी चांगल्यात चांगला वकील करण्याचे ठरवले आणि आपल्या मुलाची फाशीची शिक्षा रद्द करायची यासाठी पुंडलिक पाटील पाहिजे तेवढा पैसा खर्च करण्यास आणि लावण्यास तयार होते. त्यासाठी चांगल्यातला चांगला वकील शोधण्यासाठी गावोगावी शहरोशहरी फिरत होते. खूप वकील, कायदेतज्ञ यांच्याकडे पुंडलिक पाटील जाऊन आले पण त्या सर्वांनी हातवर केले आता आम्ही काहीच करू शकत नाही न्यायालयाचा आदेश हा अंतिम असतो तुमच्या मुलाला फाशी होणार आणि त्यातून त्याला कोणीही वाचवू शकत नाही असेच सर्व नामवंत कायदेतज्ञ बोलत होते यात तर एक ब्रिटिश कायदेतज्ञ आणि त्यावेळेचे सुप्रसिद्ध वकील हेंनरी लुटीन्स यांनी सुद्धा हार मानली होती. त्यांनी सुद्धा पुंडलिक यांना मी यात काहीच करू शकत नाही, असे स्पष्ट सांगितले. या सर्वांचे मत आणि त्यांची भूमिका पाहून पुंडलिक पाटील हताश झाले. ते आता फक्त आपल्या निष्पाप मुलाचा मृत्यू आपल्या उघड्या डोळ्यांनी पाहणार होते. याच्या शिवाय त्यांच्याकडे काहीच नव्हते. असेच काही दिवस गेले तो फेब्रुवारी महिना होता पुंडलिक पाटील यांचे विजापूरचे एक नातेवाईक पुंडलिक पाटील यांना भेटण्यासाठी आले होते. त्यांचे नाव अडवणे ते विजापूरमध्ये एक समाज सुधारक म्हणून कार्य करत होते. त्यांना पुंडलिक पाटील यांनी सर्व माहिती दिली. माझा मुलगा बेगुन्हेगार आहे पण सरकार खरा आरोपी सोडून एका निष्पाप मुलाला फासावर देत आहे मला न्याय पाहिजे त्यांनी अडवणे यांना सर्व सांगितले ते कोण कोणाला जाऊन भेटले मोठ्या मोठ्या वकीलांना जाऊन भेटले पण कुणीच माझ्या मुलाला वाचवण्यासाठी पुढे येत नाही आणि माझी केस सुद्धा घेत नाही! पुंडलिक पाटील यांचे सर्व म्हणणे ऐकून घेतल्यावर अडवणे यांनी त्यांना सांगितले आपण एक शेवटचा पर्याय म्हणून बॅरिस्टर ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर’ यांना जाऊन भेटू ते खूप मोठे बॅरिस्टर आणि उच्च कायदेतज्ञ आहेत ते काहीतरी करतील असे बोलून अडवणे यांनी पुंडलिक पाटील यांना उद्या आपण मुंबईला जाऊन बॅरिस्टर आंबेडकर साहेबांना भेटू ते यातून काहीतरी नक्कीच मार्ग काढतील अडवणे यांच्या अश्या विश्वासाच्या बोलण्यामुळे पुंडलिक पाटील यांच्या आशा उंचावल्या आणि त्यांना आशेचा किरण दिसून आला. ठरल्याप्रमाणे ते दोघे पुंडलिक पाटील यांच्या कारने मुंबईला निघाले. दुसऱ्या दिवशी ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भेटण्यासाठी त्यांच्या बंगल्यावर गेले पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांना भेटले नाही त्या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे त्यांच्या पनवेलच्या फार्म हाऊसवर विश्रांतीसाठी गेले होते असे त्यांना समजले ते तडक पनवेलच्या दिशेने निघाले ते पनवेलमध्ये रात्री पोहचले. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भेट घेतली आणि त्यांना सकाळी येऊन मला भेटा. मी बघतो तुमची काय केस आहे ती असे सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अश्या बोलण्यामुळे पुंडलिक पाटील यांचा उत्साह वाढला कारण आतापर्यंत ते ज्या-ज्या कायदा तज्ञाला, नामवंत वकिलाला जाऊन भेटले होते. त्या-त्या सर्व वकिलांनी त्यांना सॉरी आम्ही यात काहीच करू शकत नाही असे सांगितले होते, पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांना मी बघतो तुमची काय केस आहे यात मी बघतो हा शब्द फार दिलासादायक पुंडलिक पाटील यांना वाटला आणि त्यांना एक आशेचा किरण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये बघायला मिळाला! दुसऱ्या दिवशी सकाळी अडवणे आणि पुंडलिक पाटील हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना येऊन भेटले त्या दोघांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सोफ्यावर बसवून त्यांचे म्हणणे ऐकण्यास तत्पर झाले पण इथे एक प्रॉब्लेम होता तो म्हणजे पुंडलिक पाटील हे दक्षिण सोलापूरचे असल्यामुळे त्यांना मराठी येत नव्हती ते कन्नड बोलायचे त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांची भाषा समजत नव्हती अखेर थोडीफार मराठी येत असलेल्या अडवणे यांना त्यांची भाषा भाषांतर करण्यास सांगितले. पुंडलिक पाटील यांचे सर्व म्हणणे ऐकल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांची फाईल स्वतः जवळ ठेवून घेतली आणि सांगितले मी तुमची केस घेतली आहे मी फाशी सुनावण्याच्या वेळेस कोर्टात येईल आणि याला अजून 6 महिने आहे. मी येईन तेव्हा कोर्टात. आता तुम्ही निश्चित जा.



धम्मपाल देशभ्रतार
मो. 9131422581

ठरल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोलापूर सत्र न्यायालात आरोपीची बाजू मांडण्यासाठी हजर झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आले आहेत ही वार्ता सोलापूर विजापूर आणि इतर आजूबाजूच्या गावांना समजली तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पाहण्यासाठी त्या सोलापूर शहराच्या कोर्टात हजारो लाखो लोक जमले होते (काही जेष्ठ पत्रकार आणि साहित्यिक सांगतात की, त्यावेळी सोलापूर शहरातील हॉटेल्स, दुकाने, यांच्यावरील सर्व खाद्य पदार्थ, साहित्य, पुस्तके आदी सर्व संपले होते. हा त्या दिवसाचा उच्चांक आहे). डॉ. बाबासाहेब आंबेडकर कोर्टात आल्यावर स्वतः त्या न्यायाधिशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वागत केले, केस चालू झाली. दोन्ही वकिलांचा युक्तीवाद झाल्यावर सत्र न्यायालयाच्या न्यायाधिशाने पूर्व फाशीच्या शिक्षेवर शिक्कामोर्तब करून आरोपीला फाशीची सजा सुनावन्यात आली. न्यायाधिशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सांगितले आम्ही आरोपीला फाशीची शिक्षा सुनावत आहोत तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर इतकेच बोलले ठीक आहे मला मान्य आहे आरोपीला फाशीची शिक्षा व्हायला पाहिजे माझी काही हरकत नाही पण माझी एक अट आहे आरोपीला जेव्हा फाशी देण्यात येईल तेव्हा तुम्ही स्वतः आणि तुमचे न्यायालीन मंडळ तिथे हजर असायला हवे आता मी कुठलेच पिटीशन दाखल करत नाही. दीड महिना गेल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुन्हा एकदा सोलापूर कारागृहात हजर झाले तिथे शिवप्पाला फाशी देणार होते त्या कारागृहात हजर झाले. ठरल्याप्रमाणे आणि कायद्याच्या सचोटीत राहून न्यायालयीन कामकाज सुरू झाले. न्यायाधीश सुद्धा हजर झाले आरोपीला फाशी देण्यासाठी सर्व तयारी झाली. आरोपीला फाशीच्या दिशेने आणण्यात आले, इकडे पुंडलिक पाटील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जी सदर भावना होती त्यावर खेद व्यक्त करत होते अडवणे सुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना यांच्यातून काही तरी दिलासा पर्याय शोधून काढतील म्हणून पूर्ण विश्वास ठेवून होते पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर तर स्वतः फाशी द्या, आरोपीला फाशीची शिक्षा झालीच पाहिजे असे स्पष्ट सांगत आहेत हे असे कसे ख्यातनाम बॅरिस्टर असे अनेक शंका कुशंका त्या दोघांच्या मनात प्रश्नांचे घर करत होते. इकडे आरोपीला फाशीच्या तख्तावर आणले त्याच्यावर काळा कपडा टाकला हे सर्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तिथे बसून बघत होते आणि न्यायाधिश डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे बघत होते जल्लादने आरोपी शिवप्पा याच्या गळ्यात फाशीचा दोरखंड टाकला त्यावर लगेच बॅरिस्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी stop the my lord असे बोलून न्यायाधीशाकडे बघून ओरडले न्यायाधिशाला काहीच समजले नाही बॅरिस्टर बाबासाहेब आंबेडकर पुन्हा ओरडले stop the this actively my lord! न्यायाधिश बॅरिस्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे बघत म्हणाले what's the stupid question? Why stop the court activity? बॅरिस्टर आंबेडकर "my lord तुम्ही सजा फक्त फाशी देण्याची ठरवली होती, जीव घेण्याची नाही!" तुमची सजा आता पूर्ण झाली तुमच्या न्यायलयीन कामकाजानुसार आरोपीच्या गळ्यात फास अटकवला त्यात ती सजा पूर्ण झाली आता तुम्ही आरोपीला कुठली ही सजा देऊ शकत नाही. आरोपी आता दोष मुक्त झाला आहे तुमची सजा आरोपीने पूर्ण भोगली आणि पुर्ण केली! आणि बॅरिस्टर आंबेडकर अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे म्हणणे त्या ब्रिटिश न्यायाधिशाला मान्य करावे लागले (आणि तेव्हापासून आरोपीला फाशीची सजा देताना मरेपर्यंत फाशी अशी सजा देण्यात येते) आणि शिवप्पा यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली! हीच आहे बुद्धाची मैत्री. बोधिसत्व डॉ. आंबेडकर भविष्यातले मैत्रेय बुद्ध सिद्ध होतात. आज ही पाटील यांच्या देवघरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मूर्तीवजा पुतळा आहे. आजची जी पाटील यांची पिढी आहे ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची रोज पूजा करते! आपण जी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे जी Ambassador कार बघतो ती पुंडलिक पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांच्या जन्मदिनाच्या दिनी भेट म्हणून दिली आणि पूर्ण गावात पुंडलिक पाटील यांनी सोलापूर शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो हत्तीवर ठेवून पूर्ण सोलापुरात साखर वाटली होती. ■ ■

# ‘परमेश्वर नावाच्या शक्तीचा’ कसलाही पुरावा गेल्या पाच हजार वर्षांत माणसाला देता आलेला नाही...

प्रबोधनाच्या नावाने जर ते निधर्मीवादाकडे वा निरिश्वरवादाकडे गेले असते, तर आज रशियात जो प्रसंग उद्भवला तो उद्भवला नसता. जो माणूस ईश्वर मानत नाही, त्याचा विचार मला आदर्श वाटतो. फुल्यांनी क्रांतिकारक विचार मांडताना ‘निर्मिती’ ही कल्पना मांडली, तेव्हा तो त्यांच्या विचारातला मला उणेपणा वाटला. आंबेडकरांसारखा माणूस ठामपणे सांगतो की, ‘मी निरिश्वरवादी आहे. तरीसुद्धा मी हिंदू धर्म सोडण्याची भाषा करतो, तेव्हा ती निधर्मी होत नाही. फक्त बुद्धधर्मीय होते. का तर बुद्ध हा निरिश्वरवादी होता. बुद्धाने ईश्वर नाकारलेला होता म्हणून मला बुद्ध धर्म स्वीकारावासा वाटला.’ पण या गोष्टीला माझा विरोध आहे. मग जो माणूस परमेश्वर मानतो, त्याला मी कधीच आदर्श मानत नाही. मग तो ज्ञानेश्वर असो, तुकाराम असो, की कुणी संत-महंत असो. मी बर्टांड रसेलला मानतो. तो म्हणतो, ईश्वर नाही, अशी माझी श्रद्धा आहे आणि मी नास्तिक आहे. मला चार्वाकचा विचार सर्वांत जवळचा वाटतो. तो माणूस पाच हजार वर्षांपूर्वी वैदिक काळात होऊन गेला. त्याने ‘ईश्वर’ ही संकल्पनाच नव्हे, तर आत्मा ही संकल्पनाही नाकारली होती. पुनर्जन्म नाकारला होता. म्हणून तो मला सर्वांत जवळचा. ‘परमेश्वर’ ही संकल्पना भव्य आहे. भारतीय संस्कृतीत पुरुष प्रकृतीच्या माध्यमातून ईश्वर निर्माण झाला, अशी संकल्पना आहे. त्यात प्रतिभेचा अंश नक्कीच आहे. पण एक दगडाची मूर्ती स्वतः बनवायची आणि त्याला परमेश्वर मानायचा. त्या मूर्तीचे नीट चालले की, सारे व्यवस्थित आहे हे मानायचे हे मला मान्य नाही. परवाचे एक उदाहरण सांगतो, ‘महाराष्ट्र टाइम्स’सारख्या प्रागतिक वृत्तपत्रामध्ये गणपतीच्या दिवसात मुसळधार पावसाबाबतच्या एका बातमीचे शीर्षक असे होते, ‘मुसळधार पावसामध्ये गणपतीचा मंडप मात्र शाबूत.’ बाकीच्या बातमीत होते, तुफान पाऊस पडतोय, रेल्वेत माणसे अडकून पडलीत. अनेक झोपडपट्ट्या वाहून गेल्या आहेत. अनेक माणसे वाहून गेली आहेत. हा हल्लाकल्लोळ यावेळी चालू असता गणेश नावाची जी देवता आहे, ती स्वतःचा मंडप मात्र शाबूत ठेवते आहे आणि याला आम्ही ‘विघ्नहर्ता’ म्हणतो! अशा ठिकाणी माणूस आपली बुद्धी का गहाण टाकतो, ते कळत नाही. आपण ज्या ज्या अंधश्रद्धा आहेत असे म्हणतो, म्हणजे बुवाबाजी, भानामती, करणी, मूठ मारणे, फलज्योतिष बघता येणे, या सगळ्या अंधश्रद्धांचे मूळ परमेश्वर या संकल्पनेत आहे आणि दैवशक्ती ही कल्पना केल्याशिवाय तुम्ही अंधश्रद्ध असूच शकत नाही. सत्यसाईबाबा हात फिरवून अंगठी कशी काढू शकतो, तर त्याला दैवी शक्ती प्राप्त झाली आहे. एखाद्या बाईच्या अंगात आले की, ती भविष्य कशी सांगू शकते, तर तिच्यात दैवी शक्ती आहे. प्रत्येक अंधश्रद्धेच्या मुळाशी देवी शक्तीवरचा विश्वास आहे. तो विश्वास म्हणजे सगळ्या अंधश्रद्धांचे मूळ आहे. ते मूळ म्हणजे दैवी शक्ती ही संकल्पना उखडल्याशिवाय म्हणजेच परमेश्वर ही संकल्पना डोक्यातून काढून टाकल्याशिवाय अंधश्रद्धेचे निर्मूलन होणार नाही. पाच हजार वर्षांपासून अनेकानी प्रयत्न केले. कपिल, कणाद, चार्वाक तसेच संत तुकाराम महाराज, गाडगेबाबा, असे अनेक संत झाले., पेरियार रामस्वामी अय्यर, महात्मा ज्योतिबा फुले झाले आणि आतापर्यंत डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे प्रयत्न झाले, परंतु अंधश्रद्धा कमी होत नाहीत. गेली पाच हजार वर्षे त्या जास्त जास्त दृढ होत चालल्यात. ‘ईश्वर’ ही संकल्पना आपणच निर्माण केली आहे. समजा, एखादे मूल निर्जन बेटावर वाढले, तर त्याच्या डोक्यात ईश्वर ही संकल्पना येईल का? नक्कीच नाही. सागराला, सूर्याला नमस्कार करणे हा संस्काराचा भाग आहे. मात्र मी नमस्कार केला नाही, तर अघटीत घडेल, हा श्रद्धेचा भाग झाला. पूजेला माझा विरोध नाही, पण पूजा काही स्वार्थी भावनेने केली जाते, त्याला माझा विरोध आहे. पूजेला विरोध करण्याचे कारण नाही. त्यामध्ये भावना कुठल्या आहेत, ते महत्त्वाचे आहे. समुद्र ही नियतीची एक शक्ती आहे. ती मला भरपूर देते. त्यावर माझे आयुष्य अवलंबून आहे आणि असा समुद्र थोडा ओसरला आहे. उद्यापासून माझ्या बोटी मी हाकारणार आहे, तर त्याआधी हा तुला नमस्कार. हा अतिशय सुंदर संस्कार आहे. म्हणून पूजा करणे या प्रकाराला माझा विरोध नाही. त्यामागे भावना काय आहे हे महत्त्वाचे आहे. परमेश्वराची पूजा करतात, त्याबद्दल मला आदर आहे. ■ ■




डॉ. श्रीराम लागू

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



# ‘धम्मलंकार परिवेन’ वृद्ध आणि रुग्ण भिक्खूंचे निवासस्थानाचे भूमिपूजन सोहळा



**नागपूर :** प्रेरणा फाउंडेशन नागपूरच्या वतीने ग्राम बनवाडी जिल्हा नागपूर येथे ‘धम्मलंकार परवेन’(वृद्ध आणि रुग्ण भिक्खूंचे निवासस्थानाचे) भूमिपूजन सोहळा संपन्न झाला. यावेळी भूमिपूजन सोहळ्याला अध्यक्षस्थानी पूज्य भिक्खू प्रियदर्शी महास्थवीर, उद्घाटक डॉ. राजाभाऊ टाकसाळे (संचालक सेंट पॉल स्कूल), विशेष उपस्थिती पूज्य भिक्खू डॉ. सत्यानंद महास्थवीर, संस्थेचे अध्यक्ष पूज्य भिक्खू डॉ. अभयनायक थेरा तसेच इतर सर्व मान्यवर मंडळी उपस्थित होते. प्रेरणा फाउंडेशन नागपूर वृद्ध आणि रुग्ण भिक्खूंसाठी ‘धम्मलंकार परिवेन’ नावाने वृद्धाश्रम सुरू करण्याचा मानस आहे. बौद्ध भिक्खू आपले संपूर्ण आयुष्य हे धम्माच्या प्रचार प्रसारासाठी तसेच सेवा करण्यासाठी अर्पण करतात, परंतु एका विशिष्ट वयामध्ये वृद्धापकाळमध्ये बौद्ध भिक्खू यांच्याकडून धम्माचा प्रचार प्रसार होत नसल्यामुळे त्यांना परत त्यांच्या कुटुंबीयाकडे जावे लागते, तर काही भिक्खू आपल्या कुटुंबाकडे वापस जाऊ शकत नाही, त्यामुळे वृद्धापकाळात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. याचे उत्तम उदाहरण हे कोरोना काळामध्ये आपणास पहावयास मिळाले. त्यामुळे या सर्व गोष्टींचा विचार करून डॉ. भदंत अभयनायक थेरा अध्यक्ष प्रेरणा फाउंडेशन नागपूर यांनी वयोवृद्ध भिक्खूंसाठी ‘धम्मलंकार परिवेन’ (वृद्ध आणि रुग्ण भिक्खुंचे निवास) वृद्धाश्रम सुरू करण्याचा मानस केला आहे.

भिक्खू डॉ. अभयनायक थेरा हे मूळचे अमरावती जिल्ह्यातील वरखेड येथील असून ते मागील 31 वर्षापासून बौद्ध भिक्खू म्हणून धम्माचा प्रचार आणि प्रसार करत आहे. त्याचप्रमाणे त्यांना सामाजिक कार्याची आवड असल्यामुळे त्यांनी नागपूर येथे प्रेरणा फाउंडेशन या सामाजिक संस्थेची स्थापना करून संस्थेअंतर्गत बालकांचा सर्वांगीण विकास, शिक्षण, आरोग्य व निराधार, अपंग, रोगाने त्रस्त असलेल्या वयोवृद्धांची सेवा वयोवृद्ध भिक्खूंची सेवा, तसेच नागपूर येथे ग्रामीण भागातून उपचारासाठी आलेल्या रुग्णांना आवश्यक ती सर्व वैद्यकीय मदत डॉ. भदंत अभयनायक हे आपल्या प्रेरणा फाउंडेशन या संस्थेमार्फत उल्लेखनीय कार्य करत असतात. कायम सामाजिक कार्यासाठी तत्पर असलेल्या डॉ. भदंत अभयनायक यांनी सुरू केलेल्या या उपक्रमाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# आदिवासी समाज बांधवांना सोबत घेऊन उलगुलान करा : भाऊ खुरसंगे

## क्रांतिवीर बिरसा मुंडा यांचा 125 वा शहीद दिनी अभिवादन



**नागपूर :** बिरसा मुंडा आदिवासी कल्याण महासंघ व बिरसा मुंडा बहुउद्देशीय संस्था बुट्टीबोरी यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतिवीर बिरसा मुंडा यांच्या 125 व्या शहीद दिनानिमित्ताने अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक माजी अतिरिक्त समाज कल्याण विभाग पुणे, एम. एम. आत्राम यांच्या शुभ हस्ते करण्यात आले व कार्यक्रमाचे अध्यक्ष रामदास मरस्कोल्हे आणि अतिथी पाहुणे म्हणून प्रभू राजगडकर, डॉ. नीलकंठ कुलसंगे, डॉ. संजय राऊत, डॉ. गजानन धुर्वे, दिनेश शेराम आणि मुकुंद उइके तसेच मुंबईचे अभियंता शिवकुमार आडे आणि राजू राजगडकर यांची मंचावर उपस्थित होते. सत्कारमूर्ती विदर्भातून आलेले जसे एकापल्ली, नरखेड, हिंगणा, रामटेक आणि चंद्रपूर येथून सत्कारमूर्तीची कार्यक्रमाला उपस्थिती होती. या कार्यक्रमात 10 वीत 75टक्केच्या वरून आणि 12वी मध्ये 70 टक्के उत्तीर्ण होणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. क्रिष्णा कुंभारे यांचाही सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक आयोजक भाऊ खुरसंगे यांनी केले तर संचालन रमेश आडे यांनी तर चंद्रशेखर उइके यांनी आभार मानले. पूर्ण विदर्भातून आलेल्या मान्यवरांचे तसेच विद्यार्थ्यांचे स्वागत व कौतुक आयोजक भाऊ खुरसंघे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रभा खुरसंगे, मुकेश खुरसंगे, चारुलता उईके, मंथन खुरसंगे, प्रदीप धुर्वे, दिलीप मडावी, शालिक मडावी, मोतीराम सिरसाम यांनी परिश्रम घेतले व आदिवासी समाज बांधवांची मोठ्या संख्येत उपस्थिती होती.




## स्वयंदिप बुद्धविहार

टाकळी सिम (प्रथम) हिंगणा रोड नागपूर, विपश्यना केंद्र, सकाळी सामुहीक ध्यान, वंदना प्रत्येक रविवारी सामूहिक कार्यक्रम, 4 था रविवार 1 दिवशीय विपश्यना शिबीर मुलांसाठी वयोगट ८ वर्षे, विविध विशेष कार्यक्रम राबविल्या जातात. मनोहर उके सहभागी असतात.

संवाद मित्र, भदंत नागदिपंकर महास्थविर
मो. 9423605550

## महत्वाचे

### गोंदिया येथे 22 जून रोजी वधू-वर परिचय संमेलन

**गोंदिया :** नागपूर येथील जेष्ठ कार्यकर्त्यांच्या पुढाकारातून येत्या 22 जून रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, गोंदिया येथे विदर्भ स्तरावर वधू-वर परिचय संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. नागपूरचे विजयकांत मांडवे आणि प्रशांत सहारे हे बौद्ध विवाह विषयक चळवळीचे जेष्ठ कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. त्यांच्या सहयोगातून अनेकांचे मंगलपरिणय जुळलेले आहेत. त्यासाठी त्यांनी विशेष यंत्रणा उभारली आहे. त्यांच्या मार्गदर्शनातून गोंदियातील भिमघाट बुद्ध विहार समिती या कार्यक्रमाचे आयोजन करीत आहे. आजच्या धकाधकीच्या काळात लग्न जुळविण्यासाठी परिचय मेळावे हा एक चांगला पर्याय मानला जातो. कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी इंदु सातपुते 9730459060 यांना संपर्क साधण्यास हरकत नाही.

### महा. अंनिसने दिला वटसावित्रीला वृक्षारोपणाचा पर्याय



**नागपूर :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती कोराडी शाखेच्या वतीने विद्युत विहार वसाहत येथे वटसावित्रीला वडाच्या झाडाची फांदी तोडून घरी न आणता किंवा वडाच्या झाडाला पतीच्या पुनर्जन्माची मागणीसाठी फेरी न करता वृक्षारोपणाचा पर्यावरण पूरक पर्याय सुचवून वटसावित्री पौर्णिमा साजरी करण्यात आली. यावेळी कोराडी शाखा अध्यक्ष ताराचंद पखिडे, बबन गायकवाड, विलास भालेराव, बाळकृष्ण झाडोकार यांनी वृक्ष संवर्धनाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाला प्रमिला झाडोकार, पूनम अवचार, भारती चौधरी, ईश्वरी वाकळे, मल्हार अवचार, अदीक चौधरी उपस्थित होते.

# डॉ. बाबसाहेब आंबेडकर इंटरनॅशनल पार्क 130 एकर जमीन मिळण्याकरिता बैठकीत गांभीर्याने चर्चा



**नागपूर :** संघमित्रा रामटेके यांच्या निवासस्थानी धम्मयान नगर येथे निवृत्त मुख्यधापिका तसेच समितीच्या कोषाध्यक्ष सुधा चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या प्रसंगी प्रत्येक पदाधिकारी यांनी पार्क संदर्भात विचार व्यक्त केलेत.
2 जुन 2025 रोजी समितीचे शिष्टमंडळ उत्तर नागपूरचे आमदार डॉ. नितीन राऊत यांच्या नेतृत्वाखाली एनआयटी च्या सभागृहात बैठक घेण्यात आली. नागपूरचे पालकमंत्री तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्याचे समाजकल्याण मंत्री संजय शिरसाट यांच्यासोबत लवकरात लवकर मीटिंग लावून देतो असे आश्वासन दिले.
या विषयावर चर्चा करण्याकरिता आणि पुढील दिशा, आयोजन नियोजन कश्या प्रकारचे करता येईल यावर समितीचे संयोजक सामाजिक कार्यकर्ता सुनील लांजेवार व समितीचे सल्लागार ॲड. हंसराज भांगे तसेच प्रा. पुष्पा घोडके आणि समितीचे पदाधिकारी यांनी गांभीर्याने चर्चा केली. सर्वानुमते हीच 130 एकर जमीन मिळावी आणि उत्तर नागपूर मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल पार्क व्हायला पाहिजे हीच सर्वांची मागणी आहे. या सभेला माजी नगरसेवक मुरली मेश्राम, हरिश नारनवरे, शेखर पाटील, जगताप, बहुजन हिताय संघाचे कार्यकर्ता विजय सुरवाडे, प्रमिला टेंभेकर, माया घोरपडे, भावना पोफरे, प्रतिमा कोचे, शारदा मोटघरे उपस्थित होते. संचालन नरेश महाजन यांनी केले तर आभार डॉ. पद्माकर रामटेके यांनी केले.

# परदेशी शिक्षणाबाबत ‘द प्लॅटफॉर्म’ तर्फे ऑनलाइन कार्यशाळा

**नागपूर :** ‘द प्लॅटफॉर्म’ या सामाजिक संस्थेच्या वतीने रविवार, 8 जून रोजी ‘Foreign Education’ या विषयावर निःशुल्क ऑनलाईन कार्यशाळा आयोजित करण्यात आली. ही कार्यशाळा SC, ST, OBC, VJ, NT, SBC आणि Minority Muslim या घटकांतील विद्यार्थ्यांसाठी विशेषतः केंद्रस्थानी होती. कार्यक्रमाचे संचालन व सविस्तर मार्गदर्शन सॉफ्टवेअर इंजिनिअर व सामाजिक कार्यकर्ते राजीव खोब्रागडे यांनी केले. त्यांनी परदेशी शिक्षणासाठी लागणाऱ्या शिष्यवृत्त्या, QS रँकिंग आधारित प्रवेश, SOP, LOR, Admission प्रक्रिया, प्रोफेसरशी संपर्क, थेट प्रवेश व इंटरव्ह्यू या सर्व बाबींचे सविस्तर विवेचन केले. कार्यक्रमात विशेषतः महाराष्ट्र शासनाच्या SC, ST, OBC, VJ, NT, Minority विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शिष्यवृत्ती योजनांची सविस्तर माहिती सादर करण्यात आली. विद्यार्थ्यांनी या योजनांचा लाभ कसा घ्यावा, याचे तपशीलवार मार्गदर्शन करण्यात आले. केंद्र सरकारच्या NOSS योजनेबाबतही माहिती देण्यात आली. राजीव खोब्रागडे यांनी स्पष्ट केले की National Overseas Scholarship ही योजना फक्त अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांसाठी मर्यादित आहे, तर स्त्र साठी स्वतंत्र व मर्यादित जागांची योजना उपलब्ध आहे. त्यामुळे इतर घटकांतील विद्यार्थ्यांनी राज्याच्या व अन्य आंतरराष्ट्रीय स्कॉलरशिप्सकडे लक्ष द्यावे.

वयमर्यादा किंवा महाराष्ट्र शासनाच्या शिष्यवृत्तीतील इतर पात्रता अटींच्या बाहेर असणाऱ्यांसाठी DAAD (Germany), Erasmus Mundus, Chevening, Fulbright, Commonwealth, MEXT यांसारख्या आंतरराष्ट्रीय स्कॉलरशिप योजनांबाबतही अत्यंत स्पष्ट आणि नेमके मार्गदर्शन देण्यात आले.
द प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून आजवर अनेक विद्यार्थ्यांना योग्य माहिती, मदत आणि प्रेरणा मिळाली आहे. संस्थेने RTI चा प्रभावी वापर, कायदेशीर लढाया, शासन व शैक्षणिक संस्थांच्या विरोधातील आंदोलने, तसेच SC, ST, OBC, Minority आणि Open वर्गातील विद्यार्थ्यांच्या न्यायहक्कासाठी सातत्याने आवाज उठवला आहे. कार्यक्रमाचे पॅनलिस्ट्स -राजीव खोब्रागडे – सॉफ्टवेअर इंजिनिअर व सामाजिक कार्यकर्ते डॉ. अनिकेत धोंगडे – सायंटिस्ट, सिगेट, आयर्लंड शुभम जैस्वाल – PhD स्कॉलर, बर्मिंघम, यूके चक्षुपाल वानखेडे – ऑस्ट्रेलिया तसेच मोनिश बावनगडे (जपान), साहिल शेख (यवतमाळ) व सुमित जांभुळकर (नागपूर) हे या कार्यशाळेचे मॉडरेटर व समन्वयक म्हणून कार्यरत होते. या उपक्रमाबद्दल राष्ट्रपिता फुले अभ्यासिकेचे मेश्राम यांनी अभिनंदन व्यक्त करत म्हटले की, द प्लॅटफॉर्मचा हा उपक्रम सामाजिक व शैक्षणिक परिवर्तनाच्या दिशेने एक प्रेरणादायी पाऊल ठरतो.

# ‘कपाळगोंदण’ या ललितलेख संग्रहाचे रविवारी पुसद येथे प्रकाशन




**पुसद :** निशा डांगे नायगांवकर यांच्या सृजनशील लेखणीतून साकारलेल्या आणि डिंपल पब्लिकेशन, वसई यांनी प्रकाशित केलेल्या ‘कपाळगोंदण’ या ललितलेख संग्रहाचे प्रकाशन सोहळा रविवार दि.15 जून 2025 रोजी सकाळी 11.30 वाजता नवीन पुसद येथील राजे उदाराम मंगल कार्यालयात आयोजित केलेला आहे. या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रसिद्ध लेखक प्रदीप दाते हे राहणार असून, पुस्तकाचे प्रकाशन अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे सदस्य व साहित्यिक देवीदास फुलारी यांचे शुभ हस्ते होणार आहे. यावेळी ‘कपाळगोंदण’ या पुस्तकावर ज्येष्ठ लेखिका विजया मारोतकर या भाष्य करणार असून, पुसद पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी संजय कांबळे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी साहित्यिक बापू दासरी यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. या ग्रंथ विमोचन सोहळ्याचे निवेदन कवी श्रीनिवास मस्के हे करणार आहेत. विदर्भ साहित्य संघ शाखा पुसद आणि सिद्ध साहित्यिक समूहाच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम होणार असला तरी, डांगे व नायगावकर परिवाराने आणि डिंपल पब्लिकेशन यांनी आयोजित केलेला आहे. पुसद पंचायत समितीमध्ये जि. प. शिक्षिका म्हणून कार्यरत असलेल्या शिक्षिका यांचा ‘कपाळगोंदण’ हा ललित लेखसंग्रह चिंतनशील असून मानवी वृत्ती प्रवृत्तीवर विवेचन करून समाजाला सकारात्मक दृष्टिकोन देणारा आहे. निसर्ग, अवतीभवतीच्या घटनाप्रसंग, नातेसंबंध, स्त्री संवेदनांच्या जाणिवा आणि नेणिवा, तारतम्य- वास्तवभान तसेच अनुभव अनुभूती यांचा सुरेख संगम असलेला उत्तम ललित संग्रह आहे. या प्रकाशन सोहळ्यास अध्यापक, लेखक आणि रसिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन परिवाराच्या वतीने श्रीकृष्ण राऊत, उत्तम रुद्रवार आणि दीपक आसेगावकर यांनी केले आहे.

# बसपा तर्फे संत कबीर जयंती साजरी



**नागपूर :** संत कबीर यांची 627 वी जयंती बसपाने कही हम भूल न जाये या राष्ट्रीय अभियान अंतर्गत आज शांतीनगरच्या कबीर मठात मोठ्या थाटात साजरी केली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाराष्ट्र प्रदेश बसपाचे महासचिव पृथ्वीराज शेंडे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून बसपाचे प्रदेश मीडिया प्रभारी उत्तम शेवडे व कबीर मठाचे संचालक मुनिंद्रदास कबीर यांनी मार्गदर्शन केले. संत कबीर हे चौदाव्या शतकातील विज्ञानवादी संत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वडील सुभेदार रामजी हे कबीर पंथी असल्याने त्यांच्या शिकवणुकीचा प्रभाव डॉ. बाबासाहेबांवर पडला. त्यामुळे डॉ. बाबासाहेबांनी कबीराला आपल्या जीवनात प्रथम गुरुचे स्थान दिले असल्याची माहिती याप्रसंगी बसपा नेत्यांनी दिली. ‘पत्थर पूजे हरि मिले तो मै पुजू पहार, ताते यह चकिया भली पीस खाये संसार’ या दोह्यातून त्यांनी समाजाला वैज्ञानिक दृष्टी दीली. दगडाची पूजा केल्याने जर देव भेटत असेल तर मी पहाडाची पूजा करेल, परंतु हे करण्यापेक्षा जो चक्कीचा दगड आपल्याला पीठ बनवून खायला देते तो दगड माझ्या नजरेत महान आहे. अशी माहिती बसपा नेते उत्तम शेवडे यांनी दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक चंद्रशेखर कांबळे यांनी, संचालन धम्मपाल गोंगले यांनी तर संजय इखार यांनी आभार प्रदर्शन केले. नागपूरच्या शांती नगरातील कबीरमठ हा नागपुरातील सर्वात जुना असून त्याला 92 वर्षाचा इतिहास असल्याची माहिती या मठाचे चौथ्या पिढीतील गुरु चरणदास यांचे चिरंजीव मुनिंद्रदास कबीर यांनी सांगितले. कार्यक्रमाला प्रामुख्याने अभिलेश वाहाने, गौतम पाटील, नरेश वासनिक व विलास सोमकुवर, अभय डोंगरे, विनोद नारनवरे, अनिल मोहबे, धर्मपाल कीरपान, अनिल खोब्रागडे आदि प्रामुख्याने उपस्थित होते.

# सत्यशोधक रघुनाथ ढोक यांचा आज सत्कार



**नागपूर :** श्री गुरुदेव सेवामंडळ, नागपूर तर्फे संत कबीर यांच्या 627 व्या जंयती निमिताने श्रीगुरुदेव सेवाश्रम , सुभाष रोड , नागपूर येथे दि.12 जुन 2025 रोजी सायंकाळी 6.30 वाजता पुणे येथील सत्यशोधक रघुनाथ ढोक,पुणे यांचा जाहीर सत्कार आयोजित केलेला आहे. प्रमुख पाहुणे आचार्य हरिभाऊ वेरूळकर, नांदुरा आश्रम, जनार्दन पाटील, राष्ट्रीय प्रचारक, डॉ. दिलीप नेवसे, सातारा, मा. शिवदास महाजन, माजी न्यायाधीश उपस्थित राहणार आहे. सत्यशोधक रघुनाथ ढोक मागील अनेक वर्षापासुन कार्य करीत आहेत. त्यांचेमुळे कार्यामुळे सत्यशोधक चळवळीस पुन्हा एकदा पुनर्जिवन मिळाले आहे. यावेळी संस्थेचे सर्व कार्यकारिणी मंडळ उपाध्यक्ष संगीता जावळे, सहसचिव राजेश कुंभलकर, प्रचारप्रमुख सियाराम चावके, प्रा. रामदास टेकाडे, प्रभा ठवकर व प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रसंत साहित्य अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब पदवाड, रुपराव वाघ, डॉ. गणेश चव्हाण, रामराव चोपडे, सुरेंद्र बुराडे, बंडोपंत बोढेकर, श्री. दिलीप सुरकार उपस्थित रहाणार असल्याची माहिती श्री. गुरुदेव सेवामंडळ, नागपूरचे अध्यक्ष व कार्यक्रमाचे मुख्य आयोजक अँड. अशोक यावले व सचिव विठ्ठलराव पुनसे यांनी दिली आहे.

## जाहिरात



प्रॉपर्टी घेणे विकणे भाड्याने देणे अधिक माहिती करिता
संपर्क
९३२५६२९६३५

## आजचे कार्यक्रम

### साप्ताहिक प्रबोधन भीमोदय बुद्ध विहार

दिनांक : गुरूवार 12-6-2025,
वेळ : संध्याकाळी ७.०० वाजता.
स्थान : भीमोदय बुद्ध विहार, विश्वकर्मा नगर, नागपूर.
विषय :-छत्रपती शाहू महाराज यांची 151 वी जयंती.
प्रबोधनकार : मा. ॲड. अतुल पाटील.

## निधन वार्ता

### अशोक भीमराव पाटील



**नागपूर :** सम्राट अशोक मानव कल्याण मंडळ नागपूरचे प्रथम अध्यक्ष अशोक भीमराव पाटील यांचे वयाच्या 71 व्या वर्षी दि.10/6/2025 ला अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार बुधवार दि. 11/6/2025 ला सकाळी 11 वाजता वैशाली निर्वाण घाट येथे करण्यात आला. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा व दोन नातू असा मोठा परिवार आहे. ते समाजात सर्वांना घेऊन चालणारे नम्र व मनमिळाऊ स्वभावाचे होते.

# वज्जी वेंचर्स लिमिटेड कंपनीचे उद्घाटन



**नागपूर :** वज्जी वेंचर्स लिमिटेड कंपनीचे वेअर हाऊस आणि कार्यालयाचे उद्घाटन प्रसिद्ध व यशस्वी उद्योजक अमिताभ मेश्राम यांचे हस्ते पार पडले.
वर्तमान परिस्थितीचे चित्र लक्षात घेता असे दिसून येते की; सद्याचे व्यापारी व भांडवलदार धार्जिन्या सत्ताधाऱ्यांनी सरकारी क्षेत्रातील नोकऱ्यांची दारे सामान्य बहुजनांसाठी व मागासवर्गासाठी कायमचे बंद केलेले आहेत. उच्च शिक्षण घेतलेल्या गुणवत्ताप्राप्त युवकांना देखील नोकरीसाठी वनवन भटकावे लागत आहे. काहींना ठेकेदारांमार्फत लागलेल्या उच्च शिक्षितांना कमिशन वगळून मिळणाऱ्या तुटपुंज्या वेतनावर रात्रंदिवस राबवून घेतले जात आहे. अशा परिस्थितीत प्रा. डॉ. भीमराव गोटे, निलेश नाखले, राहूल गेडामकर आणि इतर तीस चाळीस लोकांनी प्रत्येकी एक लाख रूपये शेअर्स निधी जमवून वज्जी वेंचर्स लिमिटेड कंपनी स्थापन केली. या प्रसंगी केंद्रीय समन्वय विभागाचे मुख्य समन्वयक हेमंत वाघमारे, प्रसिद्ध उद्योजक राजू वैद्य, सी. ए. विक्रम बोरकर, प्रा. सी. आर. शामकुवर, डॉ. एस. एम. तायडे यांनी मार्गदर्शन केले. निलेश नाखले यांनी अध्यक्षीय भाषण केले; तर प्रा. भीमराव गोटे यांनी आपल्या प्रास्ताविकात संक्षिप्त पार्श्वभूमी मांडली.
राजर्षी नगर नागपूर येथे नुकत्याच स्थापन झालेल्या वज्जी वेंचर्स लिमिटेड कंपनीचे वेअर हाऊस आणि ऑफिसच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून आला. या प्रसंगी हॉलमध्ये भरगच्च उपस्थिती होती. बाहेर लोकसुद्धा उभे राहून ऐकत होते. या प्रयत्नातून होलसेल व्यापार-व्यवसायात पदार्पण करून उद्योजक, व्यावसायिक आणि बेरोजगार नवयुवकांसाठी आशेचे एक नवे किरण निर्माण झाले आहे. दिवसेंदिवस वाढत चाललेले बेरोजगारीचे प्रमाण पाहता रोजगार निर्मितीचा हा प्रयत्न प्रशंसनीय आहे. रोजगार निर्मितीसाठी आता नोकरी हा एकमेव पर्याय होऊ शकत नाही. त्यामुळे निराश न होता सामूहिकरीत्या वाटचाल करून परस्परांच्या मदतीने आपली व आपल्या समाजाची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी अशाच प्रकारचे प्रयत्न प्रत्येक जिल्ह्यात व शहरात करण्याची गरज आहे आणि हे सहज शक्य आहे. म्हणून आता आपण आपला व्यवसायिक दृष्टिकोन विकसीत केला पाहिजे.
नोकरी फक्त एका पिढीसाठी व एका कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचे साधन आहे. पण उद्योग व्यवसाय पिढ्यान् पिढ्या चालत राहतो. नोकरीच्या माध्यमातून लाख, दीड लाख रुपये महिन्याला मिळत असले तरी दैनंदिन जीवनात लागणाऱ्या वस्तू खरेदीसाठी जेव्हा आपण खुल्या मार्केटमध्ये जातो, तेव्हा आपल्याला मिळणाऱ्या पगाराच्या 50 ते 70 टक्के रक्कम आपल्या खिशातून निघून जाते. नोकरीच्या माध्यमातून मिळालेल्या पैशाचा प्रवाह आपल्या समाजाकडे न राहता; तो इतर व्यापारी वर्गाकडे जात असल्यामुळे आपल्या समाजाची आर्थिक स्थिती पुरेशी बळकट होऊ शकली नाही. नोकरी करणारा वर्ग आपल्या पुरता सुखी झाला. ईतर घटक मात्र फारसा प्रगती करू शकला नाही. कारण खुल्या मार्केटमध्ये आपण केवळ ग्राहक म्हणूनच भूमिका बजावत आहोत. म्हणून आपण आपल्या समाजात ग्राहक म्हणून आपली भूमिका समजून घेणे आवश्यक आहे. या दृष्टिकोनातून समाजात जागृती निर्माण करून आर्थिक आणि व्यावसायिक दृष्टिकोन निर्माण करायला हवा आणि त्या माध्यमातून आपण आपला पैसा आपल्यामध्येच फिरवत ठेवायला हवा. तरच आपण उद्योग, व्यवसाय निर्माण करू शकतो आणि अशाप्रकारे आपण आर्थिक संपन्नता प्राप्त करू शकतो. यातूनच मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करता येते. हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून समाजातील निराशा व नकारात्मकता दूर करून सकारात्मक ऊर्जा तयार करू शकतो. याच उदात्त हेतूने वज्जी वेंचर्स लिमिटेड कंपनीची स्थापना करण्यात आली आहे. तेव्हा समाज बांधवांना अशी विनंती आहे की आपण देखील या उपक्रमात सहभागी होऊन परस्परांच्या मदतीने आपला पैसा मनुवादी व्यवस्थेकडे न जाऊ देता आपल्यामध्येच फिरवत ठेऊया आणि आपले उत्पादक, उद्योजक, होलसेलर, स्टॉकिस्ट, व्यावसायिक, दुकानदार, बनवूया.
या प्रसंगी राहूल गेडाम, नागेश बुरबुरे, पद्माकर गणवीर, भारत भालेराव, रमेश गायकवाड, श्रीकांत रामटेके, आशिष वारकर, अखिल धाबर्डे यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले.
या प्रसंगी ‘आपणच मालक व आपणच ग्राहक’ अशी मानसिकता विकसीत होण्यासाठी डॉ. विजय धाबर्डे यांनी उपस्थितांना शपथ ग्रहण करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन मनिषा जामूनकर आणि अर्चना भालेराव यांनी केले, तर कुलदिप टेंभुर्णे यांनी सर्वांचे आभार मानले.

## स्टुडिओ किरायाने देणे आहे



दैनिक बहुजन सौरभने एक उत्कृष्ट दर्जाचा स्टुडिओ तयार केलेला आहे. बेरोजगार विद्यार्थ्यांसाठी एक आठवड्याचा मोफत कोर्स करण्याचा मानस आहे. ज्या कोणाला नाटक, गाणी, कराओके किंवा फेसबुक रिलवर टाकणारी कोणतीही माहितीसाठी स्टुडिओचा वापर करायचा असल्यास तासाप्रमाणे भाड्याने देणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.



मो. 8482839451

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648